# लिंग पद समभाव (जेंडर) आणि कौटुंबिक हिंसाचार





– लेखिका –

**अनिता पगारे**



प्रकाशक

**संगिनी महिला जागृती मंडळ, नाशिक**

# लिंग पद समभाव (जेंडर) आणि कौटुंबिक हिंसाचार

**© संगिनी महिला जागृती मंडळ, नाशिक**
४, क्षितीश अपार्टमेंट, चेतना नगर (राणे नगर)
मुंबई–आग्रा रोड, नाशिक – ४२२ ००९.

संपर्क – ८०८०९४०९२० / ८६२५९१८१८०

पहिली आवृत्ती : १६ मे २०१९
दुसरी आवृत्ती : १२ ऑक्टोबर २०१९

प्रकाशक :
**संगिनी महिला जागृती मंडळ, नाशिक**

**मुखपृष्ठ :**
ॲड. अनुराधा शोभा भगवान, मुंबई

**मुद्रण :**
अमोघ क्रिएशन्स्,
नाशिक – ४२२ ००५.

देणगी मूल्य : १०० ₹

## पुस्तकाविषयी...

जगप्रसिध्द स्त्रीवादी नाटककार एव्ह एन्सलरचे संशोधन सांगते की प्रत्येक चौथ्या स्त्रीने आयुष्यात एकदा तरी हिंसाचार अनुभवलेला असतो. अमर्त्य सेन म्हणतात सुविधांच्या अपूर्णतेमुळे सुरक्षित बाळंतपण झाल्यामुळे, कुपोषणामुळे, बाल लैंगिक अत्याचारामुळे, कौटुंबिक हिंसाचारामुळे, जातीय दंगलीमुळे किंवा युध्दामुळे दरवर्षी आपण 'शंभर करोड' स्त्रिया गमावतो. बाई असल्यामुळे मारहाण होते हे सांगायला आपल्याला कोणाच्या अभ्यासाची काय गरज आहे. आपण जरा डोळे उघडे ठेवून आजूबाजूला पाहिले की हे लक्षात आल्यावाचून राहतच नाही. कुठलीही स्त्री वाचवणे आणि तिला सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करुन देणे ही प्रक्रिया आहे आणि त्यासाठी समाजातील सर्व समूह त्या दिशेने सक्रीय होणे अपेक्षित आहे. ह्या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आधी ही प्रक्रिया काय आहे?
हिंसाचार म्हणजे काय? हा हिंसाचार लिंग भेदामुळे होतो तर हा लिंगभेद काय आहे? प्रत्येक व्यक्तीची यात भूमिका काय? हे सांगणे, शिकवणे खूपच गरजेचे आहे. म्हणून हा अनेक जणींच्या अनुभवातून आलेला अभ्यास आहे. ज्यांना ज्यांना समाजात लिंगभेद दूर होऊन सर्व प्रकारची समानता यावी असे वाटते अशा सर्वांसाठी हे पुस्तक आहे.

हे अनेकांच्या चिंतनातून. अभ्यासातून तयार झालेले पुस्तक आहे. हे पुस्तक अंतिम आहे असे या अभ्यासात सहभागी झालेल्या कोणाचाच दावा नाही. त्यामुळे तुमच्या प्रतिसादाची, प्रतिक्रियांचे स्वागतच आहे. 'संगिनी' चा पत्ता पुस्तकात आहे. तेव्हा आठवणीने तुमचे मत, अभिप्राय नोंदवा

****

**'जेन्डर आणि कौटुंबिक हिंसाचार '** हे पुस्तक छापावे असे ठरले तेव्हा पासून पहिला प्रश्न मनात आला याचे मुखपृष्ठ कसे असावे. त्यावर बरीच चर्चा झाली. नेहमीप्रमाणे गुगलला कामाला लावले. पण समजेसे काही मिळेना. **सीमान दी बवायर** यांनी मांडलेला सिध्दांत चित्रात कसा उतरवाव याचा विचार करीत असतांनाच आमची मैत्रीण अनुराधा शोभा भगवान नारकर हिने स्वत: बनविलेले चित्र फेसबुकवर अपलोड केले होते. हे चित्र पाहिले आणि एकदम वाटलं की एस्स...

स्नेहा संस्थेने **टाकावूतून टिकाऊ** अशी स्पर्धा आयोजित केली होती. त्यात तिने हे चित्र बनवले होते. तिच्याकडे फक्त त्या चित्राचा फोटो होता. तिला विनंती केली आणि तिने परत हे इतक सुंदर चित्र ज्यात **जन्माला व्यक्ती येते किंवा येतो त्याची बाई किंवा पुरुष समाज बनवतो** हा सिध्दांत काठोकाठ भरला आहे. समाजात असलेली पुरुष प्रधानता ह्या चित्रात तिने इतकी छान दाखवली आहे. अनुचे खूप खूप आभार !..

****

## प्रकरण पहिले

## जेंडर म्हणजे काय?

प्रत्येक स्त्री पुरुष, मुलगा–मुलगी किंवा तृतीयपंथी म्हणजेच प्रत्येक जिवंत व्यक्तीने कसे वागावे, बोलावे, चालावे, जगावे, रहावे यासंदर्भात समाजाने प्रथा परंपरा द्वारा घालून दिलेल्या प्रत्येकाच्या सांस्कृतिक–सामाजिक भूमिका, जबाबदा–या, नातं, अपेक्षा आणि संधी यामुळे त्या व्यक्तीची होणारी मानसिकता म्हणजे जेंडर होय. जेंडर म्हणजे समाजाचा लिंगावर आधारित दृष्टीकोन किंवा असही म्हणता येईल की जेंडर म्हणजे त्या व्यक्तिची मानसिक स्थिती.

**फरक स्पष्ट करा**

| जेंडर | लिंग |
|---|---|
| वेळ, जागा, प्रदेश, वर्ण, वर्ग, जात, धर्म, मार्केट, शासन, भाषेप्रमाणे जेंडर बदलतं म्हणून प्रत्येक व्यक्तीचे कपडे, बोलण्याची, वागण्याची पद्धत वेगवेगळी असते | असते कुठेही, कधीही, कोणाचेही लिंग बदलत नाही. ऑपरेशन करुन लिंग बदलता येत असेल कदाचित पण तरी अंतर्गत त्यासंदर्भातल्या रचना मात्र बदलता येत नाही. म्हणजे पुरुषाचे लिंग बदलले तरी तो आई होऊ शकत नाही. स्त्रीचा पुरुष किंवा पुरुषाची स्त्री होत नाही. त्यामुळेच जगभर कुठेही जा स्त्री आणि पुरुष यांची शारिरीक रचना सारखी असते |
| ही एक मानवनिर्मित दीर्घ प्रक्रिया आहे जी सातत्याने मानवाच्या नकळत सुरु असते. | लिंग हे जन्मतःच मिळते.स्त्री आणि पुरुष यातील फरक त्यामुळे स्पष्ट होतो.एकदाच मिळणारा अवयव |

## सेक्स आणि जेंडर हे समानार्थी शब्द आहेत का?

प्रत्यक्षात हया दोन्हीही स्वतंत्र संकल्पना आहेत. जेंडर हा शब्द लिंगाशी संबंधित विषयावर बोलण्यासाठी सतत वापरला जातो त्यामुळे हे दोन्ही समानार्थी शब्द आहेत असे वाटते. लिंगानुसार वागणे ,बोलणे ठरत असल्यामुळे, भूमिका हया लिंगाबरोबरच बदलत असतात अस आपल्याला वाटते आणि म्हणून आपण हे दोन्ही शब्द समानार्थी म्हणून वापरतो. खरतर प्रत्येक स्त्री ची स्त्री म्हणून भूमिका समाजाने ठरवून दिलेल्या जेंडरचीच असेल असे नाही. उदा. एखादया स्त्रीला मूल जन्माला घालायला आवडेल पण तिला धुणंभांडी करायला आवडेलच अस नाही. याचा अर्थ ती स्त्री आहे हे लिंग म्हणून खरे पण समाजाने ज्या जेंडरची (स्त्रीची ठरवून दिलेली कामे करणे) अपेक्षा तिच्याकडून केली आहे ते तिला आवडत नाही आणि समाजाचा निर्णय ती मानत नाही.

मग तिचे जेंडर (समाजाने ठरवून दिलेले) 'स्त्री'चे असे आपण कसे काय म्हणू शकतो? **जेंडर हा सेक्स किंवा लिंग या शब्दाला समानार्थी आलेला मॉडर्न शब्द नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.**

## प्रकरण दुसरे

## जेंडर संदर्भात नेहमी वापरल्या जाणाऱ्या संकल्पना आणि त्यांची व्याख्या

• **जेंडर अवेरनेस**– लिंगपदसमभावाची जाणिव जागृती म्हणजे काय?– प्रत्येक मानव स्वतंत्र आणि वेगळी भूमिका समाजात पार पाडतो तसेच त्या प्रत्येकाची सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकिय, भावनिक, शारीरिक, प्रादेशिक गरज ही स्वतंत्र आहे, हे लक्षात घेऊन ते मान्य करणे आणि ही जाणिव यावी यासाठी तसा प्रचार, प्रसार करणे म्हणजे जेंडर अवेरनेस आणणे होय.

• **जेंडर सेन्सिटिव्हीटी**– लिंगपदसमभावाची संवेदनशिलता – वरिल व्याख्येप्रमाणे गरजेला मान्यता देऊन प्रत्येक व्यक्तीला ती भूमिका पार पाडण्यासाठी आणि गरजा पूर्ण करण्यासाठी समाजात संधी निर्माण करणे म्हणजे समाजात संवेदनशिलता निर्माण करणे होय.

• **जेंडर इक्वॅलिटी**– लिंगपदसमभावाची समानता– प्रत्येक व्यक्ती ही समान आहे. मग ती कुठल्याही लिंगाची असो, राज्यातली असो,अथवा भाषा–प्रांतातली असो याला म्हणतात समानता मानणं आणि अशी परिस्थिती असणं म्हणजे समानता असणे.प्रत्येक व्यक्तीला सर्व क्षेत्रात (सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकिय, भावनिक, शारीरिक, प्रादेशिक, कायदेशिर इ.) संधीची आणि अधिकाराची समानता निर्माण करणे तसेच ती समानता मिळावी, अनुभवता यावी यासाठी योग्य ते वातावरण, साधनं आणि संधी निर्माण करणे म्हणजे लिंगपदसमभावाची समानता आणणे होय. उदा.आपल्याकडे समानता यावी म्हणून स्त्रीयांना राजकिय क्षेत्रात आरक्षण तयार केले पण प्रत्यक्षात दलित, आदिवासी स्त्रीया सरपंच झाल्या की काहीतरी कारण पुढे करुन अविश्वासाचा ठराव पास केला जातो आणि त्यांचे पद काढून घेतले जाते. विधानसभा, लोकसभा आरक्षणाचा प्रस्ताव आजपर्यंत अनेक वेळा प्रयत्न केल्यानंतर सत्ताधारी पक्षाला सुद्धा व्हेटो काढावा लागला तेव्हा मोठया मुश्किलीने पास झाला, म्हणजे फक्त कायद्यात असून चालत नाही तर त्याची अंमलबजावणी होण्यासाठी तशी संधी निर्माण करावी लागते.

• **जेंडरची चौकट म्हणजे काय?**– स्त्री–पुरुषांना समानतेच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी येणारे किंवा घातलेले अडथळे म्हणजे जेंडर चौकट. ही चौकट समजावून घेतल्याशिवाय ती तोडायची म्हणजे काय करायचे हे कळत नाही आणि जोपर्यंत ही चौकट प्रत्येक व्यक्ती तोडत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीचा व्यक्ती म्हणून विकास होत नाही.

• **जेंडर रोल/भूमिका**– समाजाने प्रत्येक व्यक्तीला घालून दिलेली किंवा ठरवून दिलेली विविध कामे, जबाबदा–या आणि अपेक्षा म्हणजे त्या व्यक्तीची भूमिका. हया भूमिका हया जीवशास्त्रीय भूमिकेशी संबंधित असतीलच असे नाही. त्या वेळेनुसार, परिस्थितीनुसार बदलत असतात. उदा.देवीची पूजा करणारा पुजारी एका स्त्रीची पूजा करतो तर दुसरीकडे हाच पुरुष त्याच्या घरातल्या स्त्रीला मात्र मारतांना आपण पाहतो. म्हणजे एकच रुप पण भूमिका बदलली की त्याचा अर्थ बदलतो.

| रिप्रॉडक्टिव्ह रोल | प्रॉडक्टिव्ह रोल | कम्युनिटी मॅनेजमेंट रोल |
|---|---|---|
| यात मूल जन्माला घालण्यासंदर्भातली भूमिका | वस्तू आणि सेवा निर्मिती संदर्भातली भूमिका– श्रमावर आधारित काम | समाज चालवण्यासाठी आवश्यक असणा–या भूमिका.शासन– प्रशासन– राजकारणातला सहभाग |

• **जेंडर बॅलन्स**– समाजात अशी आदर्श स्थिती, जिथं सर्व व्यक्ती एकजिनसी होऊन संधीची समानता आणि परस्परांच्या आदराचा आनंद घेतील म्हणजे त्या समाजात जेंडर बॅलन्स आहे अस आपण म्हणू शकतो. एकजीनसी म्हणजे कुठलाही जात, धर्म, वर्ण, प्रदेश, आर्थिक स्थिती, लिंग यावरुन भेद न राहता सर्व मानव म्हणून समान असतील.

• **जेंडर बायस**– पूर्वग्रह– समाज जिवनात प्रत्येक व्यक्ती कुठल्या ना कुठल्या जेंडर रोल मध्ये/भूमिकेत स्वतःला गुंतवतो. ती व्यक्ती त्या रोलमध्ये कशी गुंतली हे समजावून न घेता त्या व्यक्तीला एकाच दृष्टीकोनातून बघणे, आजमावणे म्हणजे आपण त्या व्यक्ती संदर्भात पूर्वग्रह दूषित आहोत असा अर्थ होतो. उदा. कुठलीही स्त्री समोर आली की, तिला स्वयंपाक, दागिने, कपडे हे विषय आवडतातच असे गृहित धरुन त्याच विषयावर बोलणे म्हणजे त्या व्यक्ती संदर्भात पूर्वग्रह दूषित असणे होय.

• **जेंडर स्टीरिओटाईप** – समाजात प्रत्येकाला त्याच्या त्याच्या लिंगानुसार आखून दिलेली भूमिका, काम आणि जबाबदारी असते वर्षोनुवर्ष अनेक पिढया जसे च्या तसे हया भूमिका, काम आणि जबाबदा–या करत राहिल्यामुळे जे वर्गीकरण/भाग/गट/ग्रुप बनतात ते गट म्हणजे जेंडर स्टिरिओटाईप होय. आपण प्रत्येक व्यक्तीला काहीही विचार न करता सरसकट त्या गटात मोजतो. उदा. मुस्लिम म्हंटले की आपल्यासमोर पठाणी ड्रेस येतो. बरेच मुस्लिम कधीच पठाणी ड्रेस घालत नाही तरी हया स्टिरिओटाईप मध्ये आपण त्यांना घालतो. स्त्रियांना साडी घालायला आवडतच असे आपण मानतो पण प्रत्यक्ष स्त्रियांना विचारले तर त्या नक्की सांगतील की साडी हा वस्त्र प्रकार आमच्यावर लादलेला आहे.

• **जेंडर ॲनालिसेस**– विश्लेषण – जेंडरच्या रचनेमुळे प्रत्येक व्यक्तीचे जगणे, वागणे एका विशिष्ट (टाईप) प्रकारचे बनले आहे. ते असं का? कधी ? कोणामुळे बनले?

कुठपर्यंत आणि कसे त्याचे विविध परिणाम झाले इ.संदर्भात विश्लेषणात्मक अभ्यास करणे म्हणजे जेंडर विश्लेषण करणे होय.

○ **जेंडर डिस्क्रिमेनेशन** – भेदभाव करणे– एखादया व्यक्तीला पद्धतशीर पणे लिंगावर आधारित नावडतीची वागणूक देणे ज्यामुळे ती व्यक्ती तिचे अधिकार, संधी आणि संसाधनापासून वंचित राहते याला जेंडर डिस्क्रिमिनेशन करणे किंवा भेदभाव करणे असे म्हणतात.

○ **मेनस्टि्मिंग करणे / मुख्यप्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे** – जेंडर समानता समाजात यावी यासाठी जे त्या विषमतेत आहेत, ज्यांच्यामुळे ती विषमता निर्माण झाली किंवा जे त्या विषमतेचे वाहक आहेत हया सर्व घटकांबरोबर काम करणे म्हणजे त्यांना मुख्य प्रवाहात आणणे होय. उदा.स्त्रीयांवरचा अत्याचार थांबवायचा असेल तर स्त्रियांच्या बरोबरीने अत्याचार करणा–या पुरुषांबरोबरही काम करणे म्हणजेच त्यांना मुख्य प्रवाहात आणणे होय.

## प्रकरण तिसरे
## People response to GENDER
## जेंडर संदर्भात लोकांचा प्रतिसाद

**१. सहमती / संमती** – समाजाने आपल्याला आपल्या लिंगाप्रमाणे जी काही भूमिका दिली आहे ती जशीच्या तशी स्विकारणे. उदाबाईच्य ा जातीने पायातल्या चपले सारखंच वागले पाहिजे, तेच तिचे काम आहे किंवा खानदानी स्त्रिया कधी पोलिस स्अेशनची पायरी चढणार नाही, असे डायलॉग या प्रकारच्या लोकांकडून ऐकायला मिळतात. अशा वागणा–या लोकांना समाजात फारच प्रतिष्ठा मिळते, पदोपदी त्यांचा गौरव होतो त्यामुळे त्यांना आपण फारच समाजातल महत्वाच काम करीत आहोत असं वाटतं ब–याचवेळा अज्ञानामुळे ही संमती असते. पिढयान पिढया सर्व लोक तसेच वागत असतात, त्यामुळे जास्त लोक जिथे, तेच करण्याची परंपरा दिसून येते.

**२. नकार** – समाजाने प्रत्येकाला वेगवेगळे नियम लावले आहेत हे ज्यांच्या लक्षात आले त्यांनी त्याचा विचार केला आणि जेंडर निर्मितीच्या या प्रक्रियेला, भूमिकांना विरोध केला. उदासावित्रीबाई फुलें यांनी जोपर्यंत मुलींसाठी शाळा सुरु करण्याची हिंमत केली नाही, तोपर्यंत मुलींना शिकविणे म्हणजे धर्म विरोधी कृती असाच नियम होता. म्हणजे सावित्रीबाईंनी समाजाच्या हया जेंडरच्या भूमिकेला नकार दिला. भगवान बुद्धा पासून ते सर्व संत, महात्मा जोतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज हे सर्वच या परंपरेत मोडतात.

**३. तडजोड** – काहींना समाजाने दिलेली भूमिका, नियम मान्य नसतात. पण विरोध करण्यासाठी लागणारा वेळ, शक्ती, पैसा किंवा हिंमत त्यांच्याकडे नसते असे लोक तडजोड स्विकारतात उदा. ब–याच स्त्रियांना नोकरी करायची असते पण घरच्यांना ते

मान्य नसते, मग अशा स्त्रिया 'नोकरी कर पण घरातल सर्व आवरुन जा, आम्हांला काही कमी नको पडायला' ही घरच्यांची अट मान्य करून तडजोड स्विकारतात आणि तारेवरची कसरत करतात.

**४. कधी सहमत तर कधी नकार** – असे लोक वेळ, पैसा, काळ, साधनं, प्रसंग पाहून कधी कधी काही काही ठिकाणी समाजाने घालून दिलेले नितीनियम मान्य करतात तर काही काही ठिकाणी विरोध करतात. उदा. ब–याच घरांमध्ये स्वतःच्या विवाहीत मुलीने पंजाबी ड्रेस घातला तर चालतो पण सुनेने घातला की 'आमच्याकडे हे असले लाड चालत नाही' म्हणून सुनेला मान्य

करणार नाही.

**५. बाहेर एक आत एक** – हे लोक सार्वजनिक ठिकाणी स्त्री–पुरुष समानता याविषयावर जोरदार बोलणार पण स्वतःची मुलगी सात नंतर बाहेर गेली, उशीरा आली किंवा तिने स्वतःचा काही स्वतंत्र निर्णय घेतला तर यांना चालत नाही. शिवाजी जन्मो पण दुस–याच्या घरात ही म्हण अशा लोकांमुळेच तयार झाली असेल.


**६. तटस्थ** – तटस्थपणा ही एक मानसिक प्रक्रिया आहे, ती फारच कमी लोकांच्या आयुष्यात घडते. अशा लोकांना लिंगाने ते स्त्री आहे की पुरुष याने काही फरक पडत नाही. ते करित असलेली कामे ते करणारच असतात. उदा. आपल्याकडचे संत. आपण मिराबाईचे उदाहरण घेऊ या. तिची कृष्णावर असलेली श्रध्दा इतकी अतूट होती की समाजाने त्यावरून तिला कितीही त्रास दिला तरि ती तिची भक्ती/भूमिका थांबवत नाही.

## प्रकरण चौथे
## Gender and BIOLOGY
## जेंडरचा जीवशास्त्राशी संबंध

प्रत्येक नविन जीव जन्माला येण्यासाठी एका स्त्री – पुरुषाचा समागम होऊन स्त्री पुरुष बीजाचा संयोग होणे आवश्यक आहे हे आता आपल्याला पाठ झाले आहे. हया बीजांमार्फत आपल्याला आपल्या आईवडिलांकडून गुणसूत्राच्या जोडया मिळतात, म्हणून तर आपण आपल्या आईवडिलांसारखे दिसतो, वागतो, बोलतो. यात स्त्री कडे सर्व xx प्रकारच्या गुणसूत्रांच्या जोडया असतात तर पुरुषाकडे xy अशा गुणसूत्रांच्या जोडया असतात. स्त्रीकडून xx अशा 23 गुणसूत्राच्या जोडया तर पुरुषाकडूनही xx अशा 23 गुणसूत्रांच्या जोडया असे मिळून 46 गुणसूत्रांच्या जोडयांचा संयोग होऊन स्त्रीचा जन्म होतो, तर पुरुषाच्या जन्माच्या वेळी स्त्रीकडून गग अशा 23 गुणसूत्रांच्या जोडया तर पुरुषाकडून गल अशा 22 गुणसूत्रांच्या जोडया असे मिळून 45 गुणसूत्रांच्या जोडया एकत्र येऊन पुरूषाचा जन्म होतो. याचा अर्थ पुरुषाच्या जन्मात एक गुणसूत्राच्या जोडीची कमी असते. या 46 व्या गुणसूत्राच्या जोडीमुळे गर्भाशय तयार होते. म्हणून पुरुषाला गर्भाशय नसते तर स्त्रीला ते जन्मतःच असते. याचा अर्थ स्त्री

वयात येते तेव्हा तिचे गर्भाशय फकत सक्रिय होते. पुरुषाला गर्भाशय नाही म्हणून त्याला मासिक पाळीही येत नाही. त्याचा पाप पुण्याशी काही संबंध नाही. स्त्रीच्या बिजाशी पुरुष बिजाशी संयोग झाला तर गर्भधारणा होते

मासिकपाळीचे चक्र




प्रत्येक स्त्रीचे गर्भाशय हे तिच्या मुठी एवढे असते. मुलगी साधारण 12–13 वर्षाची झाली की, तिचे शरीर बीजकोषातून आलटून पालटून दर महिन्याला एक बीजांड त्या कोषाच्या बाहेर फेकते. जेव्हा ते बीजांड बाहेर पडते तेव्हा स्त्रीबीज शोषण्यासाठी गर्भाशयाची बोटं अखंड हालचाल करीतच असतात, ती बोटं लगेच हे स्त्रीबीज शोषतात आणि बीजवाहक नळीद्वारे गर्भाशयात आणतात जेव्हा

स्त्रीबीजाचा प्रवास सुरु होतो. या प्रवासात त्या बीजाचा पुरूष बीजाशी संयोग झाला तर जन्माला येणा–या बाळासाठी आपले शरीर अतिशय उत्कृष्ट रक्ताची गादी गर्भाशयात तयार करते. जर हे स्त्रीबीज गर्भाशयात बीजांड शोषणारी बोटं गर्भाशय बाळासाठी रक्ताची गादी स्त्रीबीज कोष बीजवाहक नळया असतांना त्याला शारीरिक संबंधाव्दारा पुरुष बीज मिळाले तर त्याचे एक एकत्र बीज तयार होते. त्याबरोबर त्याच्याभोवती एक पातळ आवरण तयार होते; ज्यामुळे त्यानंतर ते बीज सुरक्षित होते. असे हे बीज त्या रक्ताच्या गादीवर स्थिर होते आणि तिथे ते पोसले जाते आता स्त्रीबीज गर्भाशयात आले पण त्याचा पुरुष बीजाशी संयोग झालाच नाही तर ते स्त्रीबीज निकामी होते आणि योनीमार्गाने शरीराबाहेर पडते. हे जेव्हा आपल्या मेंदूला कळते तेव्हा आपले शरीर ती बाळासाठी तयार केलेली गादी काढून घेते. ती रक्ताची गादी मग योनीमार्गे रक्ताच्या रूपाने बाहेर पडते. या प्रक्रियेलाच **“मासिक पाळी”** म्हणतात वरिल.

वरिल प्रमाणे स्त्री पुरुषाचा संयोग झाला तर त्यामुळे मुल जन्माला येते. मुलाच्या जन्माच्या वेळेची गुणसूत्रांची रचना आपण पाहिली तर ती xy अशी असते. म्हणजे त्यात एक गुणसूत्राची जोडी कमी असते, यावरून स्त्रीवादी चळवळीचा एक प्रवाह अशी मांडणी करतो की, स्त्री ही जन्मापासूनच परिपूर्ण तर पुरुष अपूर्ण. 46 व्या गुणसूत्राामुळे बाईला जन्मतःच गर्भाशय असते, ज्यामुळे ती संवेदनशिल, सृजनशील बनते दोघांमध्ये

45 गुणसूत्राच्या जोडया तर सारख्याच असतात मग बाई नाजूक, मार खाणारी आणि पुरुष मार देणारा असे कसे होते ?तुम्हांलाही हा प्रश्न पडला असेल ना?खरतर 45 गुणसूत्राच्या जोडया सारख्या असल्यामुळे दोघांमध्येही ममता, प्रेम, राग, चीड हे सर्वच गुण दिसतात. आपल्याला ठेच लागली आणि रक्त आले तर जसे आईला दु:ख होते तसेच ते आपल्या वडिलांनाही होत असते. पण आईच्या डोळयात पाणी येते आणि वडिल मात्र कोरडेच असे का? याच सोपं कारण असे की, समाज मुल जन्माला आल्यापासून प्रत्येकाला वेगवेगळया मार्गाने वागवतो, वाढवतो. त्यामुळे स्त्री मधले ममत्व, भावना जाहिर व्यक्त करण्याची पद्धत, हळवेपणा, संवेदनशिलता, सहनशिलता वाढते तर पुरुषामधील कठोर, भक्कम गुण असलेले गुणसूत्र अधिक बळकट होतात म्हणून तर आपण म्हणतो की, प्रत्येक बापात एक आई तर प्रत्येक आईत एक बाप असतो किंवा प्रत्येक पुरुषामध्ये एक प्रेमळ स्त्री तर प्रत्येक स्त्री मध्ये एक कठोर पुरुष असतो. आता ही विभागणी कशी झाली हे आपण पुढच्या भागात पाहू, त्याआधी आणखी एक शास्त्रीय माहिती आपण घेऊ यातमानवाच्या मेंदूत ग्रे आणि व्हाईट मॅटर नावाचे रसायन असते. ग्रे मॅटर मुळे जी माहिती ज्ञानेंद्रियांमार्फत आपल्या मेंदूला मिळते त्याचे विषयानुसार किंवा वेगवेगळया पद्धतीने वर्गीकरण करण्याचे काम केले जाते, त्याला म्हणतात इनफरमेशन प्रोसेसिंग. तर व्हाईट मॅटर मुळे आपल्या मेंदूतले जे ज्ञानेंद्रियांचे केंद्र आहेत त्यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे काम केले जाते. हे समजावे म्हणून एक उदाहरण घेऊ या. आपण रस्त्याने चालत आहोत. आपण पाहिलं की, एक व्यक्ती हातावरचा डास मारत आहे. ही माहिती डोळया वाटे आपल्या मेंदूत गेली. मेंदूने ही पाहिलेली घटना व्यवस्थित वर्गीकरण करून ठेवली. काही दिवसांनी आपल्या हातावर डास बसतो. काही सेकंदात आपण हात उचलतो आणि डासाला मारतो. खरतर माहिती डोळयाने घेतलेली होती मग कृती हाताने कशी केली ?तर हा जो समन्वय आहे तो व्हाईट मॅटर मुळे होतो. डास चावणं आपण कुठं अनुभवलेलं होतं?आपण तर फक्त पाहिलं होतं. पण त्या व्यक्तीने ज्या चीडेने, स्पीडने डासाला मारले याचा अर्थ त्याला तो चावला हा विचार ग्रे मॅटर मुळे आपल्या मेंदूने त्यावेळेसच करून त्यानुसार ती माहिती संबंधित विभागाला ठेवून दिली होतीहे आपण सविस्तर समजावून घेणे अत्यंत महत्वाचे आहेजीवशास्त्र ाच्या मांडणी प्रमाणे ग्रे मॅटर हे 6 पटीने पुरूषाकडे स्त्री पेक्षा जास्त आहे, तर व्हाईट मॅटर हे 10 पटीने स्त्री कडे पुरुषापेक्षा जास्त आहे. याचा अर्थ एखादे संकंट आले तर स्त्रीने पुरुषापेक्षा 10 पट लवकर त्यावर प्रतिसाद दिला पाहिजे. म्हणजे दोघांच्या हातावर एकाच वेळी डास बसला तर स्त्रीने पुरुषाच्या 10 पटीने आधी हात उचलला पाहिजे अस शास्त्र सांगते. पण स्त्री मरेस्तोवर मार खाते पण कधीच हात धरत नाही, किंवा उलटा फटका देत नाही अस कस काय होतं हे आपण पुढच्या प्रकरणात समजावून घेऊ या.

# प्रकरण पाचवे
# Social Construction of GENDER
# लिंगपदभावाची सामाजिक जडणघडण

असं काय समाजात घडते ज्यामुळे बाई अशी फक्त रडकी, हळवी होते आणि पुरुष मारणारा, चीडखोर, रागीष्ट होतो. हे समजावून घेण्यासाठी आपल्याला प्रत्येक व्यक्तीची वाढ लहानपणा पासून कशी होते, कोण कोणत्या संस्था/यंत्रणा मधून तो जातो, त्याचा काय परिणाम त्याच्यावर होतो हे पाहिले पाहिजे. बहुतेक व्यक्तींच्या आयुष्यात कुटुंब, समाज, मित्र परिवार, शाळा, मार्केट, शासन आणि धर्म हया पैकी काही किंवा कदाचित सर्व संस्था/ यंत्रणा येतात .

आपण आता जो सिद्धांत समजावून घेणार आहोत त्याला **लिंगपदभावाची सामाजिक जडणघडणीचा सिद्धांत** असे म्हणतात. हे समजावून घेण्यासाठी एक उदाहरण घेऊ या समजा एक जुळं जन्माला आले आहे, त्यात एक मुलगी आणि एक मुलगा आहे. जन्मतः जशी मुलगी रडते, बोटं चुखते तसेच मुलगाही रडतो, बोटं चुखतो. अशी ही जुळी मुलं जेव्हा साधारण 15 वर्षाची होतात तेव्हा मुलगी नाजूक, रडणारी आणि मुलगा न रडणारा, धैर्यवान आणि दणकट बनतो असं का?जे आधी समान होते ते पुढे जाऊन वेगवेगळे केव्हा काही ठिकाणी तर एकमेकांच्या विरोधी कसे झाले?

**जन्माला येण्यापूर्वी** – काही लोक गर्भवती महिलेच्या पोटाचा आकार, तिला ज्या पदार्थांचे डोहाळे लागले आहेत, जस जाणवतय त्यावरून मुलगा की मुलगी याचा अंदाज बांधतात–याचवेळा त्यांच्या निरिक्षणाच्या अनुभवावरून त्यांचा अंदाज खरा निघू शकतो. त्या अंदाजानुसार त्या गर्भवती महिलेला वागवायलाही सुरूवात होते. याचा परिणाम गर्भावर फारच गंभीर होतो. तुम्ही अभिमन्यूची गोष्ट ऐकली असेलच की, त्याच्या आईने चक्रव्यूह कसा भेदायचा ते ऐकले, पुढे तिला झोप लागल्या मुळे चक्रव्यूहातून बाहेर कसे पडायचे हे ऐकायचे राहिले. त्यामुळे अभिमन्यू चक्रव्यूह भेदून आत तर गेला पण बाहेर पडू शकला नाही. सद्या तर आपल्याकडे सातव्या महिन्यापासून गरोदर स्त्रीला 'गर्भसंस्कार श्लोक' सि.डी किंवा कॅसेट व्दारे ऐकवले जातात किंवा त्यासाठी विशेष क्लास लावले जातात.


एखादया बाईला जर उठता बसता सारखं कोणी ऐकवल की तुला मुलगी होणार आहे तर त्याचा परिणाम तिच्यावर नक्की होतो. तिला मुलगीच हवी असेल किंवा तिला मुलगी म्हणून तिच्या लहानपणी चांगली सकारात्मक वातावरण मिळालं असेल; तिच्या ईच्छेप्रमाणे वागू–जगू दिलं असेल तर अशी महिला त्या येणा–या मुलीचा मनापासून स्विकार करते पण याउलट तिचं आयुष्य गेलं असेल, तिला स्वतःला सतत अडवल्याची वागणूक मिळाली असेल तर अशी स्त्री धास्तावते, घाबरते; काय होईल पुढे माझ्या मुलीचे हया विचाराने दुःखात जाते याचा परिणाम गर्भावर होतो.


गर्भ मुलाचा असेल तर तो बिनधास्त होतो की, आईच्या पोटातून बाहेर आल्यानंतर आपली काळजी करणारे, संरक्षण करणारे अनेक लोक आहेत, त्यामुळे आपण निश्चिंत व्हायला हरकत नाही. याउलट मुलीचा गर्भ असेल तर तो गर्भ स्वतःला जिवंत ठेवण्यासाठी सर्व प्रयत्न करतो. त्यामुळेच गर्भपात होण्यासाठी जर काही प्रयत्न झाला तर मुलाचा गर्भ पटकन पडतो पण मुलीचा गर्भ स्वतःला वाचवतो. लहान मुलांमध्ये आपण पाहतो की, जरा वातावरण बदलल की मुलगे पटकन आजारी पडतात पण मुली पटकन आजारी पडत नाही काही लोक तर एवढे बेदरकार आहेत की ते गर्भजल लिंग परिक्षा करून मुलीचा गर्भ असेल तर काढून टाकतात. त्यासाठी तर आपल्याला या परिक्षेचा गैरफायदा घेणा–या पालकांना, डॉक्टरांना शिक्षा करणारा कायदा निर्माण करावा लागला. पश्चिम महाराष्ट्र हा सुधारलेला, श्रीमंतांचा प्रांत समजला जातो तर तिथं सर्वात जास्त गर्भजल लिंग परिक्षा आणि स्त्री भ्रृण हत्या होतात. त्याउलट गडचिरोली सारख्या अतिदुर्गम, आदिवासी भागात स्त्री भ्रृण हत्या अगदी कमी, नाही के बराबर होतात. तिथलं दर हजारी पुरूषांमागील स्त्रीयांच प्रमाणही सांगली पेक्षा जास्त आहे.

**जन्माच्या वेळी**– मुलगी झाली तर फिंदरी झाली आणि बर्फीचे वाटप पण मुलगा झाला तर मात्र पेढे वाटणार असं का? काही लोक तर मुलगी झाली म्हणून बाळंतणीला भेटायला देखिल जात नाही. मुलाची वाट पहात मुली होऊ देणा–या एका आईने सासरच्यांचा काय प्रतिसाद येईल या भितीने नुकत्याच जन्मलेल्या मुलीला फटका मारला आणि पहिले दोन दिवसाचे अत्यंत महत्वाचे दूधच पाजले नाही. एका(मला एकच माहित आहे प्रत्यक्षात प्रमाण किती तरी असेल) नव–याने तिसरीही मुलगी झाली म्हणून पत्नीला दवाखान्यातच सोडून दिले.

**शून्य ते सव्वा महिना** – मुलगाा झाला असेल तर बाळ– बाळंतिणीला मसाजला प्रॉपर मसाजवाली बोलविली जाते पण मुलगी असेल तर घरच्या घरी किंवा तिच्या आईकडूनच आंघोळ घातली जाते

**अशी होते लिंगपदभावाची सामाजिक जडणघडण**






वरिल सर्व घटक म्हणजे खेळणी, कपडे, खेळ, भाषा, शिक्षण, प्रसारमाध्यमं आणि आदर्श यामुळे पुरूषामधले दादागिरी करणारे, जरा काही झाले तरी हात उचलणारे गूण अधिक वाढतात तर मुलगी ते बाईच्या प्रवासात वरील सर्व घटकांमुळे तिला तिच्या आवडीप्रमाणे कधीच हसू, खेळू, नाचू दिलं जात नाही. सतत कोणी ना कोणी तिच्यावर दबाव, मालकी हक्क दाखवत असतात. लहानपणी वडिल, वयात येते तेव्हा नवरा तर म्हातारपणी मुलांचा तिच्यावर दबाव असतो. त्यामुळे स्त्रियांना आणि समाजातील इतर घटकांनीही तेच पाहिलेल असल्यामुळे बाईला नियंत्रणात ठेवणं आवश्यक आहे आणि तिला ते आवडत अस वाटतं. ज्या मुलीने किंवा मुलाने लहानपणापासून

"लहान माझी बाहुली, मोठी तिची सावली,
घारे डोळे फिरविते, नकटे नाक उडविते,

जिने भात केला कच्चा झाला, वरण केले पातळ झाले,
पोळया केल्या करपून गेल्या, आडाचं पाणी ओढायला गेली
धपकन पडली पाण्यात ”

हेच बडबड गीत नाचून नाचून ऐकल असेल, गायल असेल तिला जीव नकोसा वाटला की विहिरीच आठवते आणि त्याला ती विहिरीत पडली तरी आश्चर्य वाटत नाही, चिड येत नाही गावात नदी असून मुली विहिरीतच कशा मरतात?जिने लहानपणी नदीत पोहोत होती म्हणून आईच्या हातचा मार खाल्ला ती विहिरीत पडून मरतेच कशी?

**स्त्री पुरूषांसाठी असलेल्या या वेगवेगळया नियमावलीमुळे त्यांच्यावर परिणाम काय होतो ते पाहू या............**

| स्त्रीया | पुरूष |
|---|---|
| स्वत:बद्दलचा आदर, आत्मविश्वास याची कायम कमतरता दिसते. | कितीही गंभीर/दु:खद प्रसंग आला तरी पुरूष रडत नाही. त्यामुळे त्यांच्यात दु:ख साचत जाते, अशा साचलेल्या दु:खाचा भार जास्त झाला तरि खंबीरच रहावे अशी अपेक्षा समाज करतो तेव्हा मग छोटया छोटया कर्जासाठी, अपमाना साठी आत्महत्या करतात किंवा हार्ट अॅटकला सामोरे जावे लागते. |
| स्वत:च दु:ख लपवून ठेवण्याची सवय लागते. स्त्रीया १०—१० वर्ष मार खातात पण बोलत नाही.सहन होत नाही तेव्हा बाहेर सांगतात मग त्यांच्यावर कोणी विश्वास ठेवत नाही. | जाऊ दे तो प्यायलेला होता अस म्हणून दारूडयांना सूट मिळत असल्यामुळे भांडणांसाठी, दु:ख विसरण्यासाठी दारूचा आधार घेतला जातो |
| मैदानी खेळ नसल्यामुळे शरीराने नाजूकच राहतात, मारामारी जाऊदे स्वसंरक्षणही करू शकत नाही.सतत आजारी, अशक्त, नाराज असतात. | खेळामुळे धडधाकट, पिळदार शरीर तयार होतं. खेळामुळे झिज होते, त्यामुळे भूक लागते,भरपूर जेवण होतं, त्यामुळे चांगले पोषण होते |
| मुलींना फारच कमी खेळ खेळू दिले जातात. मुलींसाठी जे खेळ आहेत उदा. चल्लस, सागरगोटया इ. यासारख्या देवाच्या भरवशावर चालणा—या खेळामुळे स्वत: काही निर्माण करू शकतो, गोष्टी कौशल्या मुळे निर्माण होतात याच पुरेसे ज्ञान नसते. त्यामुळे नवरा मारतो तेव्हा यातून आपण मार्ग काढू शकतो हेच लक्षात येत नाही. त्याउलट माझं नशिबच फुटक अस म्हणतात. | खेळामुळे विविध कौशल्य मिळतात उदा. गोटयांमुळे नेम, पंतगीमुळे एकाग्रता, विटीदांडूमुळे जजमेंट, क्रिकेट मुळे व्यावहारीकता इ. खेळासाठी बाहेर पडल्यामुळे बाहेरच जग,त्याची वागण्याची पद्धत यासारखं व्यवहारचातुर्य मिळतं. मित्रांचे गट तयार होतात मनमोकळ करायला, दु:ख,भांडण, कटकट,राग विसरायच्या जागा तयार होतात. |
| सतत घरात असल्यामुळे बाहेरचे जग माहित नसते.जेव्हा अचानक बाहेर पडतात तेव्हा घाबरतात, गोंधळतात | लहानपणापासूनच सतत बाहेर त्यामुळे बाहेरच्या जगाची चांगली ओळख, भिती कमी होते किंवा वाटतच नाही |

| | |
|---|---|
| मित्रमंडळी नाहीत, घरात—बाहेर कोणाचा आधार नाही त्यामुळे आयुष्यभर दु:खातच राहतात. | नोकरी, मित्रमंडळ यामुळे स्वत:च आधार देणार सर्कल तयार होतं |
| आत्ताच्या मुली ज्यांच्याकडे शिक्षण आहे, जगण्याची उत्तम साधनं आहे त्या आजूबाजूच्या अनुभवामुळे लग्न करायलाच घाबरतात. | |

## याचा परिणाम होऊन खालीलप्रमाणे स्त्री—पुरूष तयार होतात

| स्त्री | पुरूष |
|---|---|
| लाजाळू | धीट |
| नाजूक | धडधाकट |
| व्यवहारशून्य | व्यवहारचतुर |
| परावलंबी | स्वावलंबी |
| मेकअप, दागिन्यात रमलेली | मोकळा |
| घरालाच विश्व समजून त्यात | सर्व स्त्रोत ताब्यात असलेला |
| गुंतलेली | अनेक नेटवर्कचा सदस्य असलेला |
| | कमावणारा • घर,गाडी,बॅंक खाते असलेला |

| |
|---|
| जगात स्त्रीयांची संख्या 50 टक्के आहे. पैकी 66 टकके स्त्रीया काम करणा—या आहेत. पैकी 10 टक्के स्त्रीयांनाच त्या कामाचा मोबदला मिळतो आणि फक्त 1 टक्का संपत्तीवर स्त्रीयांची नांवे आहेत |

## प्रकरण सहावे
## Gender and Women's Movement
## जेंडर आणि स्त्रिवादी चळवळ

**चळवळीचा उगम आणि प्रवास** :- भारतात स्त्रीवादी चळवळ 1975 पासून सुरु झाली असे सांगितले जाते. प्रत्यक्षात महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी सुरु केलेल्या शाळा ही खरतर स्त्रीवादी चळवळीची सुरुवातच होती. भारतात 1975 च्या स्त्रीवादी चळवळी पर्यंत स्त्री ही नैसर्गिक दृष्टया, जन्मत:च अबला असते असे मानले जात होते. भारतात 1975 च्या स्त्रीवादी चळवळीने पहिल्यांदा 'स्त्री' ही अबला म्हणून तर पुरूष दणगट म्हणून जन्माला येत नसून तसे घडविले जातात म्हणजेच जेंडर ही एक प्रक्रिया आहे हे पुराव्यांसह, अभ्यासाद्वारे सिद्ध केले. यामागे जगभर झालेल्या स्त्री वादी चळवळीचा तसेच भारतातल्या समाज परीवर्तनाच्या चळवळींचा आधार होता, म्हणून आपण जगभर जेंडर चळवळीच्या संदर्भात काय काय घडले याचा आढावा घेऊ या.

• **१६१६** मध्ये ओल्ड फ्रेंच भाषेत जेंडर हया शब्दाचा उल्लेख आढळला. लॅटिन भाषेत जिनस वरून जेंडर हा शब्द बनला असा उल्लेख आढळतो. जिनस म्हणजे काईंड, टाईप, सॉर्ट म्हणजे प्रकार किंवा च्या सारखा.

• **ऑक्सफर्ड ई.डी.**- ओईडीआय, व्हॉल्यूम जी, 1900 यात अधिकृत रित्या जेंडर म्हणजे काईंड असं छापलं गेल.

• **ॲरिस्टोटल**- या ग्रीक तत्ववेत्त्याने जेंडर या शब्दाचा वापर मस्क्युलाईन, फेमिनाईन ॲण्ड न्यूटर हे मनुष्यप्राण्यातील जीवशास्त्रीय भेद दाखवण्यासाठी केलेला आढळतो. हया भेदामागची मानसिकता दाखवण्यासाठी हया शब्दाचा उपयोग केलेला नाही.

• पाश्चिमात्य देशांमध्ये जेव्हा संघटितपणे, सामूहिकरित्या स्त्रीवादाची मांडणी झाली; त्या पहिल्या टप्प्यात स्त्रीयांचे कामगार म्हणून अधिकार, त्यांचे वेतन, कामाचे तास हेच विषय अग्रक्रमावरती होते. स्त्री वादी चळवळीच्या दुस–या टप्प्यात म्हणजे साधारण 70 च्या दशकात जेंडर ही संकल्पना, स्त्रीची स्त्री म्हणून आज असलेली भूमिका ही निसर्गतः नसून ती पुरूष वर्चस्ववादी समाजाने हेतु पुरस्सर तयार केली आहे; ही मानसिकतेची घडण ही एक प्रक्रिया आहे ही मांडणी झाली. स्त्रीयांची आजची स्थिती ही समाजातील लिंगभेदामुळे आहे हे जगभरातल्या विविध स्त्री वादी चळवळींनी मांडले.

• **जॉन ॲकनर थिअरी** – प्रत्येक व्यक्तीची समाजात लिंगभेदा संबंधित मानसिकतेची जडणघडण होते. त्यासाठी कुटुंब, राज्य, श्रमाच मार्केट, धर्म (वर्तणूकी संदर्भात), विविध सत्ता यांचा वापर होतो. या घटकांव्दारा प्रत्येक व्यक्तीच्या वर्तणूकीला/शारीरिक कृतीला मान्यता व स्थान दिले जाते, त्यातून त्या त्या व्यक्तीची मानसिकता घडत जाते. त्यासाठी संकेत (सिंबॉलस्), भाषा, आदर्श, ड्रेस कोड, प्रसार माध्यमं याव्दारे पुढच्या पिढीला जेंडर एक्सप्लेन केले जाते, त्यासाठी तयार केलं जाते. जे लोक ही मानसिकता मान्य करतात त्यांचा गौरव करून हया मानसिकतेचा विचार पक्का/रिएनफोर्स केला जातो. जे लोक ही प्रक्रिया नाकारतात, त्यांना कसे नाकारायच/विरोध करायचा याचीही तयारी करवून घेतली जाते. सामाजिक संरचना निर्माण करण्यासाठी सातत्याने चालणारी ही एक मुलभूत प्रक्रिया आहे. समाजाने घालून दिलेल्या प्रथा पाळणा–यांना मान्यता आणि न पाळणा–यांना नकार असल्यामुळे समाजाने ठरवून दिल्याप्रमाणे भूमिका करणे म्हणजेच आपला परिचय हे इतक निश्चित, सहज घडतं की जेंडर म्हणजेच सेक्स अस समीकरण बनलं आहे.

• **ज्युडीथ बटलर** :- सोशल कन्स्ट्रक्शन मार्फत स्त्रीवर नियंत्रण केलं जातं कारण जेंडर ही राजकिय संकल्पना आहे.

• **सिमांत दी बुवायर** (Simone de Beauvoir) :– ''स्त्री ही स्त्री म्हणून जन्माला येत नाही. ती एक व्यक्ती म्हणून जन्मते. मासिक पाळीनंतर जीवशास्त्रीय दृष्टया ती निर्मितीक्षम व्यक्ती बनते. पण समाजात स्त्रीला तिच्या जन्मा पासून तर मृत्यू पर्यंत समाजाला अपेक्षित असलेल्या प्रतिमेसाठी तयार केले जाते. याचा अर्थ स्त्री जन्माला येत नाही तर समाज सामाजिकदृष्टया तिला जन्माला घालतो. त्यासाठी समाज तिची गरज काय आहे हे विचारात न घेता तिला शिकवत जातो.'' अस अभ्यासपूर्ण विश्लेषण

सिमांत दी बुवायर यांनी मांडले आहे. स्त्रीवादी चळवळीच्या वैचारिक जडण घडणीत सिमांत दी बुवायर यांचा खूप मोलाचा वाटा आहे. त्यांनी त्यांची वैचारिक भूमिका 'दि सेकंड सेक्स' या पुस्तकातून खूप आधी मांडली.

• **मायकेल श्चवेल्बी** (Michael Schwalbe):– प्रत्येक व्यक्तीला योग्य (प्रॉपर) कसं जगावं हे शिकवावच लागतं, त्यासाठी प्रत्येक व्यक्तीतला वर्तणूकीतला फरक आवश्यकच आहे. प्रत्येक व्यक्तीच स्वतंत्र अस्तित्व ओळखता आलं पाहिजे, त्या व्यक्तीबद्दल आपल्या भावना त्याला पोहोचवता आल्या पाहिजे, त्याला/तिला पाहताक्षणी आपल्याला त्यांच वर्गीकरण करता आलं पाहिजे. यासाठी ही समाजात काहीतरी शिकवण्याची प्रक्रिया असणे आवश्यक आहे. त्या अर्थाने जेंडर ही प्रक्रिया घडते.

• 2004 मध्ये **डेव्हीड हेग** या विचारवंताने म्हंटल की, स्त्रीवादी चळवळीला माझाी सहानुभूती आहे कारण हया कार्यकर्त्या शास्त्रज्ञींनी मला जीवशास्त्रीय लिंग बदलवण्यापेक्षा जेंडर निवडण्याची संधी उपलब्ध करून दिली.

• **जेंडर आणि आंबेडकरी चळवळ** :– भारतात स्त्री वादी चळवळ 1975 पासून सुरू झाली असं मांडले जाते. पण अचानक 75च का ? अशी अचानक सर्वांना एकदम भावना कशी काय निर्माण झाली. हे समजावून घेण्यासाठी त्या आधीच्या काही चळवळी समजावून घेतल्या पाहिजे. भारताच्या संदर्भात स्त्री वादी चळवळ समजावून घेण्यासाठी त्याचे मुख्य सहा भाग करावे लागतील.

**१. अदिमकाळ ते षेतीचा षोध** :– जेव्हा मनुष्यप्राणी गुहेत राहत होता. टोळीने राहून, अन्नाच्या शोधासाठी भटकंती सुरू होती तेव्हा मिळेल ते अन्न सेवन करून स्वतःला जिवंत ठेवायचे. त्यानंतर अग्नीचा शोध लागला. मांस भाजून, शिजवून खाल्लं पाहिजे, ही प्रक्रिया आहे हा शोध लागला. तेव्हा स्त्री तो अग्नी टिकवण्यासाठी एका ठिकाणी म्हणजे आत्ताच्या भाषेत घरी राहू लागली आणि पुरूष शिकारी साठी बाहेर पडत राहिला. शिकार करणे आणि अग्नी टिकवणे हे दोन्हीही तितकेच महत्वाचे आणि समाजासाठीची सामूहिक कृती होती. त्यामुळे त्यात भेदभाव/इगो/राग लोभ नव्हते.

स्त्री जेव्हा तेव्हाच्या काळात घरी होती तेव्हा तिच्या लक्षात आलं की, आपण खाऊन जे बी उरतं ते जमिनीत पडल्यानंतर काही काळा नंतर जमिनीतून त्याच झाड तयार होतं तिच्या या निरिक्षणानंतर तिने ही प्रक्रिया जाणिवपूर्वक करून पाहिली आणि शेतीचा शोध लागला. हा शोध सर्वांसाठी उपयोगात आणून अन्नासाठीची भटकंती थांबून समूह स्थिर झाले. स्थिर समूहाने मग शेती करणे हाच मुख्य व्यवसाय केला. या शोधाच्या बरोबरच जसं पृथ्वी नविन जीव जन्माला घालते, तशीच स्त्री ही पुरूषा बरोबरच्या सहभागातून नविन जीव जन्माला घालू शकते. हया दोन्हीही प्रक्रिया आहेत. यासाठी दोन स्त्री पुरूषांच एकत्र येणे म्हणजे संयोग आवश्यक आहे. हे लक्षात आल्यानंतर मालकी हक्क तसेच पाविन्य किंवा योनिशूचिता(म्हणजे एका स्त्रीचा आणि

पुरुषाचाही एकाच पुरुषाशी किंवा स्त्रीशी शारीरिक संबंध) या संकल्पना जन्माला आल्या. जोपर्यंत पुरूषाच्या डोक्यातली माझी जमिन ही मालकी हक्काची भावना तशीच माझी जोडीदार जिच्या बरोबर फक्त मीच संबंध ठेवेन म्हणजे मी म्हणेल ते धान्य आणि माझच मुल हया भावना निर्माण झाल्या नव्हत्या तोपर्यंत सर्व संमतीने शेती आणि पुढच्या समूहाचा जन्म दोन्हीही प्रक्रिया सुरळीत सुरू होत्या.या भावनांच्या उदयाने स्त्रीयांच्या स्वतंत्र व्यक्ती म्हणून असलेल्या अस्तित्वावर, संचारावर बंदी आली. या बंदीचे नितीनियम लादण्यात आले.

**२. पौराणिक काळ** :– या काळा पर्यंत फक्त मुल जन्माला घालण्यापर्यंतच ज्ञानाची वाढ झाालेली होती. त्यामुळे कुठल्याही प्रकारच्या गर्भनिरोधकाचा शोध न लागल्यामुळे निसर्गतः स्त्रीचे मासिक पाळी चक्र सुरू असे पर्यंत गरोदर अवस्था सातत्याने येत असे. स्त्रीयांच्या संचारावर आलेले निर्बंध हे 'गरोदर पणातली काळजी' असे कारण पुढे करून सुरू केलेलेअसल्यामुळे स्त्रीयांनी पहिल्यांदा ते आचरणात आणले. त्यामागचे सत्ताकारण (पावर पॉलिटिक्स) लक्षात आल्यानंतर मात्र काही स्त्रियांनी हे निर्बंध नाकारले. त्यामुळेच ज्या काळात फक्त पुरूष शास्त्र शिकत त्याकाळात गार्गी, मैत्रेयी किंवा कात्यायनी सारख्या विदुषी वेदशास्त्र शिकल्या आणि दरबारात आपले पांडित्य सिद्ध केलं. 'गार्गी' हे नाव आपण कायमच ऐकतो. त्यांचा एक निकाल खूपच काही सांगून जाणारा आहे म्हणून सविस्तर.....

एकदा दरबारात एका वादविवाद सभेत दोन पंडितांमध्ये विद्वान कोण हे ठरविण्याची जबाबदारी गार्गी वर सर्व संमतीने आली. वादविवादाचे तोपर्यंत असलेले सर्व निकष लावूनही दोघेही सारखेच जिंकत होते. शेवटी विदुषी गार्गीने दोन चाफ्याच्या फुलांच्या माळा दोघांच्या गळयात घालून चर्चा घडवली. शेवटी तिने एकाला विजयी घोषित केले कारण त्याच्या गळयातली चाफ्याची माळ कोमेजली नव्हती. दुसरा जो पंडित होता त्याच्या गळयातली माळ कोमेजली कारण, त्याचा त्याच्या विचारांवर विश्वास नव्हता त्यामुळे तो ओरडून स्वतःचा मुद्दा मांडून दुस–यावर दडपण आणत होता. त्यामुळे त्याच्या शरीरात जास्तीची उर्जा निर्माण झाल्यामुळे फुलं कोमेजली. आपला विचार योग्य असला तरि तो शांतपणे मांडला पाहिजे, ऐकणा–याला तो विचार आत्मसात करायला संधी दिली पाहिजे, त्यानंतरही त्याला पटल नाही तर हे न पटण्याच त्याच स्वातंत्र्य आणि त्याला पटल नाही हे वास्तव सहज स्विकारल पाहिजे हे तत्वज्ञान गार्गीने मांडले ही तिची समाजाला दिलेली मोठी देणगी आहे. अत्यंत महत्वाचे म्हणजे त्या दोन पंडितांपैकी हारलेला तिचा नवरा असूनही निर्णयावर कुठेही त्याचा परिणाम होऊ न देण्यासाठी आवश्यक निःस्पृह, न्याय बुद्धीचा नमुनाच तिने दिला.

**३. ऐतिहासिक** :– झाशीची राणी, आहिल्याबाई होळकर, राणी ताराबाई, चॉदबिबी इ. यासर्व नेत्या काही ना काही कारणाने सत्तेत आल्या. राज्याचं नेतृत्व केलं आणि एक आदर्श नमुना तयार करून ठेवला. ज्यात राज्यकर्त्याने नागरिकांप्रती जबाबदार

असलं पाहिजे हा पायंडा पाडला. या स्त्रियांचा इतिहास पाहिला तर आपल्या लक्षात येईल की, या स्त्रिया स्वतः कर्तृत्ववान होत्या पण त्यांच कर्तृत्व सिद्ध होण्यासाठी त्यांच्या कुटुंबात काही ना काही घटना घडल्या, ज्यामुळे त्यांना या नेतृत्वाच्या जबाबदारीला स्विकारावे लागले.

ऐतिहासिक कालखंडाचा अभ्यास आपण केला तर लक्षात येईल की, सत्तेचा किंवा राज्याचा जास्तीत जास्त वेळ हा ती सत्ता टिकवणे, त्यासाठी आक्रमण करणे किंवा झालेले आक्रमण परतवून लावणे यातच गेलेला दिसतो. याकाळात राजाच्या राणीला किंवा त्या कुटुंबातल्या स्त्रियांना प्रतिष्ठा होती, त्याच वेळी लढाईच्या मैदानात मात्र हारलेल्या राज्यातल्या स्त्रियांना पळवून नेण्याची प्रथा होती. यात कोणाला काही गैरही वाटत नव्हते. शिवाजी महाराज या सर्व पार्श्वभूमिवर अत्यंत महत्वाचे वाटतात कारण त्यांनी लढाई जिंकल्यानंतरही कल्याणच्या सुभेदाराची देखणी सून तिच्या राज्यात मानमरातब ठेवून परत पाठवली. याकाळात एकापेक्षा अधिक स्त्रियांशी लग्न करणे किंवा विवाहा बाहेरही नातं विकसित करणे ही प्रथा होती अशा स्त्रियांना अंगवस्त्र म्हणत.

४. **स्वातंत्र्यापूर्वी** :- ‘स्त्री–पुरूष तुलना’ हा निबंध लिहिणा–या ताराबाई शिंदे, पूर्व प्राथमिक शिक्षणाची कल्पना भारतात आणून आदिवासी पर्यंत ज्ञानगंगा पोहोचवणा–या ताराबाई मोडक, उच्चवर्णीय तसेच पुरूषी वर्चस्ववादी मानसिकतेला नकार दिला म्हणून जेल भोगून शिक्षण घेऊन डॉक्टर झालेल्या रखमाबाई, डॉ.आनंदीबाई जोशी या टप्प्यावर चळवळ एका एका व्यक्तीच्या प्रयत्नांनी सुरू होऊन त्याचा एक समुह होताना दिसतो. याकाळात उभं राहिलेलं सावित्रीबाई फुलें सारख नेतृत्व स्वतःच्या आशा आकांक्षेच्या पलिकडे समुहाच्या आकांक्षेसाठी आग्रही असताना दिसते. त्यामुळेच त्यावेळी अशक्य वाटणा–या स्त्री शिक्षणासारख्या गोष्टीही पुढे शंभर वर्षांनी का होईना त्याचा प्रवाह जनमानसात रूजलेला दिसतो, त्याचा राजमार्ग होताना पाहू शकलो पेशव्यांच्या काळात तर संरजामी व्यवस्था होती सत्ता टिकवण्यासाठी प्रत्येकावर संशय ठेवून राज्य चालविण्याची प्रथा होती. जनानखाने बाळगणे यात पेशव्यांना विशेष पुरूषत्व वाटायचं, त्यामुळे लढाईला जातांना शस्त्र सामुग्री बरोबरच जनानखाने नेण्याची पद्धत होती. या जनानखान्यातच रमल्यामुळे पेशव्यांनी लढाई करून सत्ता मिळवल्याची उदाहरणे फारच दुर्मिळ आहेत. जास्तीत जास्त वेळा तह करूनच त्यांनी आपला जीव वाचवला आहे. ज्यांचा स्वतःचा जीव धोक्यात होता तिथं नविन विचार रूजवण्याचा प्रश्नच येत नाही म्हणून या काळात आहे त्या रूढी परंपरा टिकवण्याचे काम झालेले दिसते. त्याबरोबरच विधवा केशवपन, सती सारख्या प्रथांच उदात्तीकरण होताना दिसतं.

यानंतरच्या काळात इंग्रंजांची सत्ता आल्यानंतर त्यांना कारकून हवे होते म्हणून का होईना त्यांनी इथल्या उच्चवर्णीय पुरूषांसाठी शिक्षण आणले ज्याचा परिणाम म्हणून

जी पहिली शिक्षित पिढी तयार झाली तिच्या मनात स्वातंत्र्याच बीज पडल आणि अन्यायाला जाब विचारणारी पिढी निर्माण झाली. त्यानंतरच्या काळात मोठया प्रमाणावर पुरूष समाज सुधारकांकडून स्त्रीयांवरिल अन्याय अत्याचार करणा–या रिती रिवाज, रूढी–परंपरांविरूद्‌ध चळवळ उभी करण्याचा प्रयत्न झाला. मग राजाराम मोहन रॉय यांची सती बंदीसाठीची चळवळ असो अथवा महर्षि कर्वे यांची स्त्री शिक्षणाची चळवळ असेल

**५. स्वातंत्र्य चळवळ ते आंबेडकरी चळवळ :-** स्वातंत्र्यापूर्वीच्या स्त्री शिक्षणासाठी झालेल्या चळवळीमुळे तसेच महात्मा गांधी यांच्या डोळस नेतृत्वामुळे मोठया संख्येने स्त्रीया स्वातंत्र्य आंदोलनात मग ते विधायक काम असेल अथवा संघर्षात्मक काम असेल त्यात सहभागी झाल्या. त्या चळवळींमुळे डॉ.ॲनी बेझंट, विजयालक्ष्मी पंडित, सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी यांसारख्या धुरंधर नेत्या देशाला लाभल्या.

स्वातंत्र्य चळवळीच्या बरोबरीने मोठया संख्येने स्त्रीया रस्त्यावर उतरल्या, आंदोलनात सहभागी झाल्या त्या डॉबाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत की, समाजात स्त्रीला अतिशूद्र समजल जातं, तिला एकाच वेळेस वर्ण– वर्ग– जात –धर्म आणि लिंग यासर्वच विषमतांचा परिणाम भोगावा लागतो. स्त्री आणि दलितांचे दुःख सारखे आहे, म्हणून त्या दोन्हीही चळवळीचे उद्‌दिष्ट, धोरणं सारखी असावी असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मानत. म्हणूनच त्यांच्या प्रत्येक आंदोलनात जाणिवपूर्वक स्त्रियांसाठी विशेष कार्यक्रम घेतले जात. भारतातल्या जाती अंताच्या चळवळीत सवर्णांच्या मानसिकतेत बदल व्हावा यासाठी जेवढे प्रयत्न चळवळीव्दारे केले गेले, तेवढेच किंवा त्यापेक्षा अधिक प्रयत्न दलितांना जे या शोषणाचे बळी होते त्यांना जागृत करण्यासाठी, गुलामगिरी नाकारायला तयार होण्यासाठी बाबासाहेबांनी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणत,"एकदा का गुलामाला त्याच्या वरील गुलामगिरीची जाणिव झाली की तो त्याविरूद्‌ध बंड करून उठेल" दलितांना हया बंडासाठी तयार करण्यात इतके व्यस्त असूनही त्यांनी सर्व स्त्रियांसाठी 'हिंदू कोड बिल' सारखे पर्याय निर्माण केले. शोषणाच्या मूळावर घाव घालण्यासाठी मनुस्मृतीच दहन केले.

बाबासाहेब स्वतःला महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, संत गाडगेबाबा, राजर्षी शाहू महाराज यांचे वारसदार मानत होते म्हणूनच त्यांनी घटनेचे शिल्प साकारतांना स्त्रियांसाठी अनेक कायदे, अधिकार यांची तरतूद करून त्यांच्या आदर्शांनी सुरू केलेली स्त्रीवादी चळवळ अधिक सक्षमपणे पुढे नेली. ज्या स्त्रीने दुर्बलतेचे, विषमतेचे दुःख भोगले आहे, ती जेव्हा स्वतःच्या स्वातंत्र्याची, विकासाची गोष्ट बोलते तेव्हा स्वतः साठी तर हे सर्व ती मिळवेनच पण दुस–यावर अन्याय, अत्याचार होणार नाही याचीही काळजी घेईन हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले भाकित पुढे स्त्रीवादी चळवळीचा प्रवास पाहिला तर सिद्‌ध होताना दिसते.

**६. १९७५ ते १९९५ :- १९७०** च्या दशकात जगभर झालेल्या स्त्रीवादी चळवळीचा परिणाम आणि आताच आपण वरती पाहिलेल्या चळवळीमुळे निर्माण झालेलं वातावरण यामुळे भारतात 1975 ला स्त्रीवादी चळवळ अधिक जोमाने सुरू झाली. हया चळवळीमुळे 'स्त्री एक व्यक्ती आहे, देशाची नागरिक म्हणून तिच्यावर झालेले अन्याय म्हणजे मानव अधिकाराचे उल्लंघन आहे' ही भूमिका मूळ धरू लागली. या काळात उच्चवर्णीय का होईना पण स्त्रीयांच्या चळवळीला स्त्रीयांचे नेतृत्व मिळाले. त्यामुळेच स्त्रीयांचे प्रश्न हे स्वतंत्रपणे हाताळले पाहिजे हा विचार रूजला. एकत्र समाज कल्याण खात्यातून स्वतंत्र महिला व बाल कल्याण विभाग निर्माण होणे हा त्याचा परिपाक आहे. देशाच्या उत्पन्नात स्त्री जर तिच्या श्रमाने सहभाग देत असेल तर त्या उत्पन्नात तिचाही तितकाच वाटा आहे, तो वाटा कल्याणाच्या नावाने न देता विकासासाठी आवश्यक म्हणून अधिकृत दिला जावा हा विचार समाजाला समजवण्यात चळवळीला आपली शक्ती, वेळ खर्ची करावा लागला आणि शेवटी महिला व बाल विकास विभाग आणि त्यासाठी निश्चित तरतूद होऊ लागली.

1970 साली जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धते साठी तसेच महागाई विरोधात मोठया प्रमाणावर स्त्रियांच्याच नेतृत्वाखाली मध्यमवर्गीय आणि झोपडपट्टीतल्या स्त्रिया रस्त्यावर उतरल्या. 1972 साली शहादयात झालेल्या दारूबंदीच्या आंदोलनात सहभाग घेऊन स्त्रियांमधले धाडस सत्तेला दिसलं. साधारण त्याच दरम्यान अहमदाबादच्या इलाबेन भट यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या कष्टकरी स्त्रियांच्या 'सेवा' को ऑप मुळे आता स्त्रियांना मताबरोबर पतही मिळू लागली. 1975 ते 85 च्या दशकात 'स्त्रीयांच्या देशातल्या स्थितीचा' अभ्यास करून देशाने 'श्रम अहवाल' प्रसिद्ध केला. आमच्याकडे तर आम्ही तिला देवी मानतो म्हणजे सर्वकाही अलबेल आहे हा तोपर्यंत पिटला जाणारा डिंगोरा बंद झाला आणि स्त्रियांची आजची विषमतेची, वंचिताची स्थिती बदलण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. याच काळात 1976 ला 'समान कामाला समान वेतना'चा कायदा अस्तित्वात आला.

1980 ला मथुरा आणि माया त्यागी केस गाजल्या. ज्यामुळे कस्टोडियल रेप ही महत्वाची संकल्पना कायद्यामध्ये मान्य करण्यात आली. तोपर्यंत स्त्री ज्याच्या ताब्यात त्याला तिच्याबरोबर कसाही व्यवहार करायला जणू परवानगीच मिळाली होती. 1985 मध्ये शहाबानो केसच्या निमित्ताने मुस्लिम महिलांचे प्रश्न ऐरणीवर आले. तोपर्यंत स्त्रियांचे प्रश्न हे राजकिय प्रश्न आहेत हयाला समाजमान्यता मिळायला लागली होती. शहाबानोच्या केसने मुस्लिम स्त्रीयांचे प्रश्न फक्त त्यांच्या धर्माचे किंवा फक्त 'त्यांचे' प्रश्न कसे?हा जाब चळवळीने विचारला. या केसच्या निमित्ताने मतांच्या राजकारणासाठी धर्म वेठीला धरून स्त्रियांचा बळी देण्याचा प्रकार उघडकीस आला आणि स्त्री कुठल्याही धर्माची असली तरी तिच्यावर होणारा अन्याय हा सर्व स्त्रियांवरचा अन्याय असेल ही भगिनीभावाची बांधिलकी चळवळ मानते हे पुन्हा एकदा स्पष्टपणे समाजापुढे मांडण्यात आले.

1992 साली झालेल्या भारतीय राज्यघटनेच्या 73 व 74 व्या घटना दुरूस्तीमुळे स्त्रियांना ग्रामपंचायत, नगरपालिका आणि महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात सक्रिय सहभाग मिळाला जी अनेक वर्षांपासून चळवळीची मागणी होती.

1993 पर्यंत जागतिक बॅकेकडून देशाला येणा–या अनुदानाचा हिशेब पैशात दिला जायचा, म्हणजे किती अनुदान आले त्यापैकी कशावर किती किती खर्च झाले असा मांडला जायचा. जागतिक पातळीवरिल स्त्रीवादी चळवळीमुळे, सर्व देशांमधल्या स्त्रीवादी चळवळीचे सक्षम नेटवर्क, जागतिक परिषदा यामुळे 'जेंडर बजेटिंग' ही संकल्पना उदयास आली. या संकल्पनेच्या उदयात आणि प्रचार, प्रसारात डॉ. विभूती पटेल यासारख्या भारतातल्या अर्थशास्त्रातल्या अग्रणी स्त्रीवादी विचारवंत, महिला नेत्यांच्या मोठा वाटा आहे. या संकल्पनेमुळे आता कुठलेही अनुदान कुठल्या घटकांवर खर्च झाले याचा हिशेब पैशात मांडण्या बरोबरच त्या अनुदानामुळे स्त्रीयांना त्याचा काय लाभ झाला, त्यांच्या परिस्थितीत नेमका काय बदल झाला याची माहिती त्या त्या देशांना जागतिक बॅंकेला देणे बंधनकारक झालेआता शाळेसाठी 100 रू खर्च झाले असे सांगून लगेच पुढचे कर्ज मागता येत नाही तर या खर्चामुळे किती मुली शिकू शकल्या याची माहिती देणे आवश्यक बनले. त्यासाठी हे कसे मोजणार याचे निकष आधीच कर्जाच्या प्रस्तावात द्यावे लागतात. यामुळेच आता विशिष्ट लाभार्थींसाठी खालीलप्रमाणे विशिष्ट योजना येऊ लागल्या आहेत.

- **१. जेंडर स्पेसिफिक पॉलिसी** :– निश्चित जेंडरसाठी, परिणामकारक निश्चित बदलासाठी.
- **२. जेंडर न्यूट्रल पॉलिसी** :– सर्वांसाठी. स्त्री पुरूष दोघांसाठी, निश्चित ध्येय धोरणांसाठी सद्या जी धोरण आहेत, साधनं–संसाधन आहेत त्यातल्याच गोष्टींचा / कुवतीचा वापर करून अंमलबलावणी.
- **३. जेंडर ट्रान्सफरमेटिव्ह पॉलिसी** :– यात स्त्री पुरूष दोघेही लाभार्थी असतात. त्यांच्या
- **४. जेंडर ट्रान्सफरमेटिव्ह पॉलिसी** :– यात स्त्री पुरूष दोघेही लाभार्थी असतात. त्यांच्या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन धोरणाची आखणी केली जाते. सद्यस्थिती कडून आदर्शाकडे किंवा त्या दिशेने जाण्याचा प्रयत्न करणे हे उद्दिष्ट ठेऊन हे धोरण बनवले जाते. त्यासाठी असलेली साधनसंपत्ती आणि जबाबदा–यांच पुर्नवाटप केली जाते.

भारतात झालेल्या या चळवळींबरोबरच जागतिक पातळीवर झालेल्या परिषदांचा(1920 साली पहिली आणि 1985 मध्ये दुसरी परिषद भारतातच झाली, तिसरी परिषद नैरोबीत, डिसेंबर 1995 ला चौथी परिषद बिजिंग येथे झाली) परिणाम म्हणूनही अनेक टप्पे चळवळीला ओलांडता आले.

या दरम्यान भंवरीदेवीची केस सुप्रिम कोर्टात दाखल झाली जिचा अंतिम निकाल आजतागायत लागला नाही पण त्यातल्या एका अंतरिम आदेशामुळे 1997 साली कामाच्या ठिकाणी होणा–या लैंगिक छळाला गंभीर गुन्हा मानले गेले आणि तो छळ थांबावा व त्या स्त्रीच्या न्यायासाठी काही मार्गदर्शक सूचना **विशाखा गाईड लाईन** या नावाने अस्तित्वात आल्या. 1994 साली गर्भजललिंग परिक्षेवरिल बंदीचा कायदा अस्तित्वात आला. जून 1993 ला राज्याचा महिला आयोग स्थापन करण्यात आला, ज्याने 1994 साली राज्याचे महिला धोरण जाहिर झाले. 1999 ला आई ही नैसर्गिक पालक असा निकाल सुप्रिम कोर्टाने दिला.

**दिला नवा प्रवाह**:– आपण पाहिले की, स्त्रीवादी चळवळीचा पाहिला टप्पा हा कामगार म्हणून तिचे अधिकार, कामाची वेळ इविषयांवर होता. त्यानंतर व्यक्ती म्हणून तिचे अधिकार स्वतंत्र पाहिले पाहिजे हा दुसरा टप्पा आला. त्यामुळेच दुस–या टप्प्यात कामगार संघटना असतानाही स्त्रीयांना आपल्या अन्याया विरोधात न्याय मिळवण्यासाठी स्वतंत्र संघटना निर्माण कराव्या लागल्या.

या प्रवाहात आणखी वैचारिक स्पष्टता येऊ लागली आहे. सर्व स्त्रिया एकच असल्या तरी धर्म, जात पातळीवर त्या त्या स्त्री समूहाचे काही प्रश्न हे स्वतंत्र, तितकेच गंभीर आहेत. त्यासाठी त्या त्या समुहातून नेतृत्व जाणिवपूर्वक तयार केले पाहिजे हा विचार आता मूळ धरू लागला आहे. त्यामुळेच स्त्रीयांची चळवळ एकत्र असली तरी दलितांच्या प्रश्नाच्या मांडणीसाठी त्या त्या सामाजिक– आर्थिक स्तरातूनच नेतृत्व उभं राहू द्याव यासाठी प्रयत्न सुरू आहे.

## प्रकरण सातवे
## आपण काय करु शकतो

एकूण मानवाच्या विकासासाठी स्त्रीवादी चळवळीचा हा प्रवाह असाच पुढे नेणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येकाने हातातले काम सोडून मोर्चे काढण्याबरोबरच आपापल्या कुवतीनुसार सहभाग देणे आवश्यक आहे. आपण खूप काही करू शकतो. हे करण म्हणजे कार्यक्रमा पुरतं मर्यादित नसाव, ती जगण्याची रित असावी.नमुन्यादाखल काही खालील उपाय :–

**० १.** स्त्रीयांवर होणारा हिंसाचार हा कायद्याने गुन्हा आहे कुठल्याही कारणाने त्याच समर्थन करू नये, करू देऊ नये.

**० २. पर्सनल इज पॉलिटिकल** :– कुठल्याही स्त्रीला होणारी मारहाण हा तिचा आणि मारहाण करणा–यांचा खाजगी प्रश्न नसून या देशाची नागरिक म्हणून राज्यघटनेने तिला दिलेल्या अधिकारावरचे ते अतिक्रमण आहे. समाजात स्त्री पुरूष समानता नसल्यामुळे तिला हया हिंसाचाराला सामोरे जावे लागते, म्हणून हा पूर्णपणे

राजकिय आणि संपूर्ण देशाचा प्रश्न आहे हे स्वतः लक्षात घ्यावे आणि इतरांनाही ते लक्षात आणून द्यावं.

● ३. स्त्री–पुरूष आज जे वागतात हे नैसर्गिक नसून लिंगपदभावाची ती सामाजिक जडणघडण आहे त्यामुळे त्यांना तस वागायला भाग पाडले जाते हे लक्षात घेतले पाहिजे.

● ४. आपण स्वतः आपल्या सद्सदविवेक बुद्धीला, मनाला पटेल तेच कराव, दुस–यांनाही तसे करण्याची संधी द्यावी.


● ५. स्त्री–पुरूषांचे नातेसंबंध हा त्या दोन व्यक्तींचा खाजगी संबंध असतो, जो पर्यंत ती स्त्री त्यात हस्तक्षेप करायला सांगत नाही, तोपर्यंत त्या नात्याबद्दल आपण न बोलण्याची सभ्यता पाळायला हवी.

● ६. एखादया स्त्रीला मात्र कुठल्याही कारणाने, कोणीही मारहाण करत असेल तर आधी ती मारहाण थांबवा. मार खावू नका, कोणाला मारू नका, मारू देऊ नका.


● ७. समोर बोलत उभे असलेले स्त्री पुरूष हे नात्याने कोण आहेत हा खरा आपला प्रश्न नसावा. बरेच लोक काहीही माहिती न घेता दोन बोलणारे, गाडीवर जाणारे, नियमित एकत्र जाणारे स्त्री पुरूष यांच नातं हे फक्त लफडचं आहे हे घोषित करण्यासाठी आणि तसा प्रचार प्रसार करण्यासाठी एकदम उत्सुक असतात. शेकडो स्त्रीयांना, मुलींना त्यामुळे घरच्यांच्या त्रासाला, मारहाणीला, काही
ठिकाणी तर नोकरी किंवा शिक्षण सोडून देण्याला किंवा अवेळी लग्नाला ते ही विजोड जोडीदारा बरोबर अशा संकटांना सामोरे जावे लागते. त्यामुळे कोणाच्याही चारिऱ्या बद्दल शक्यतोवर बोलू नये, बोलण्याचा प्रसंग आल्यास जबाबदारीने बोलावे.

● ८. घरातल्या मुलींना त्यांची इच्छा असेल तेवढं आणि त्या विषयात शिकवाव. त्यांना त्यांच्या पायावर उभं राहण्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न करावा.

## मुलींची जननेंद्रिये




## मुलग्याची जननेंद्रिये



प्रकरण पहिले

# कौटुंबिक हिंसाचार

## व्याख्या, प्रकार, त्याचे परिणाम आणि उपाय

## प्रास्ताविक

भारत हा शेतीप्रधान देश आहे. देशात जमिनीला मातेसमान सन्मान आहे. सांस्कृतिकदृष्ट्या देशात स्त्रियांना खूपच सन्मानाची वागणूक आहे. शेतजमिनी प्रमाणेच स्त्रीलाही सन्मान, तिचे ही समारंभ साजरे करण्याची परंपरा आपल्या देशात आहे. मात्र 'मातृ देवो भव' म्हणणाऱ्यांच्या या देशात स्त्रीयांवर होणारा अत्याचार थांबवण्यासाठी दोन नविन कायदे निर्माण करुन राज्यघटनेत अंतर्भूत करावे लागले. भारतीय राज्यघटना सर्वसमावेशक असूनही, स्त्रीयांवरती होणाऱ्या अत्याचाराला नियंत्रित करण्यासाठी स्त्रीवादी चळवळीला अनेक वर्ष आंदोलन करावे लागले; ज्याचा परिणाम म्हणून '४९८ अ' व 'कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५' निर्माण करुन घटनेत त्यांचा समावेश करावा लागला. भारतीय लोकसंख्येतले स्त्रियांचे प्रमाण दिवसेंदिवस सातत्याने घटतांना दिसत आहे. १९०१ मध्ये ते दरहजारी पुरुषांमागे ९७२ होते तर २००१ साली ते घसरुन ९३३ इतके झाले आहे. हा अत्यंत काळजीचा विषय आहे; स्त्रीयांचे समाजातील दुय्यम स्थान आणि स्त्रीयांचे घसरलेले आरोग्य याचे हे द्योतक आहे.

भारतीय राज्यघटनेने स्त्रीयांना नागरिक म्हणून खालील अधिकार दिले आहेत :-

- कलम १४ – स्त्रीयांना कायद्यासमोर समानता.
- कलम १५ – जात, धर्म, लिंगावर आधारित विषमतेला प्रतिबंध.
- कलम १६ – सार्वजनिक शासकिय सेवेत सर्वांना समान संधी.
- कलम १९ – भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य.
- कलम ४२ – कामाच्या ठिकाणी निरोगी वातावरण आणि बाळंतपणासाठी रजा.

## मग असे का?

राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या २००२ च्या आकडेवारी नुसार प्रत्येक ७ व्या मिनिटाला एका स्त्रीवर अत्याचार होतो असे दिसते. मागील दोन वर्षात बलात्काराच्या १६००० केसेस दाखल झाल्या होत्या, तर २००२ मध्ये ह्या केसेसची संख्या १५००० इतकी होती. दिल्ली पोलिसांनी २००३ मध्ये जाहिर केलेला त्यांचा अहवाल मात्र थोडे वेगळे सांगतो की, बलात्काराच्या केसेसचे प्रमाण आता ८ टक्क्यांवरुन ६ टक्क्यांइतके कमी झाले आहे.

राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या नुकत्याच जाहिर झालेल्या अहवालात महाराष्ट्रातली गुन्ह्यांसंदर्भातली काही बाजू समोर आली आहे. स्त्रियांवरील हिंसाचाराच्या केसेस मध्ये महाराष्ट्राचा क्रमांक देशात चौथा लागतो. अशा केसेसचा दर हा दरवर्षी दहा लाख लोकांमागे १७३.८१ इतका आहे. हा दिल्ली (१९७.१४), मध्यप्रदेश (२०६.९७), आणि राजस्थान (२०८.१६) नंतरचा सर्वात जास्त दर आहे. कौटुंबिक हिंसाचाराच्या बऱ्याच केसेस नोंदविल्याही जात नाही हे वास्तव असूनही एकूण केसेसच्या ४३ टक्के केसेस ह्या फक्त कौटुंबिक हिंसाचाराच्या आहेत. देशाच्या कौटुंबिक हिंसाचाराच्या एकूण केसेस मध्ये महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश आणि गुजरात या फक्त पाच राज्यांच्या मिळून ६८ टक्के केसेस आहेत.

महाराष्ट्रात स्त्रियांवरील अत्याचाराच्या केसेस मध्ये विनयभंगाच्या केसेसचे प्रमाण २१ टक्के, छेडछाडीच्या केसेसचे प्रमाण ११ टक्के, बलात्काराच्या केसेसचे प्रमाण जवळजवळ १० टक्के आहे. राज्याच्या पोलिस विभागाच्या आकडेवारी नुसार सप्टेंबर २००३ अखेर पर्यंत स्त्रीयांवरील अत्याचाराच्या १०७८५ केसेस दाखल झाल्या आहेत, मागच्या वर्षी हाच आकडा ११०४७ इतका होता. ह्या केसेस मध्ये इतर गुन्ह्यांपेक्षा नवऱ्याने किंवा त्याच्या नातेवाईकांनी हुंड्यासाठी केलेला अमानुष छळ याचे प्रमाण जास्त म्हणजे ४३८३ केसेस इतके आहे. इतर मध्ये विनयभंगाच्या २१०८, बलात्काराच्या १०१२, ९२१ आत्महत्येसाठी प्रवृत्त, मुलींचे किंवा स्त्रियांच्या अपहरणाच्या ६६९ केसेस, १११ केसेस ह्या हुंड्यासाठी केलेला शारीरिक आणि मानसिक छळाच्या आहेत. ३१ केसेस ह्या हुंड्या संदर्भात आत्महत्या तर ११ केसेस ह्या हुंड्यासाठी खून याच्या आहेत. महाराष्ट्र राज्याचे पोलिस महासंचालक या आकडेवारीचे विश्लेषण करतांना म्हणतात की, राज्यात महिला संघटना, महिला आयोग, सामाजिक संघटना आणि प्रसार माध्यमांच्या जोरदार जागृती कार्यक्रमांमुळे तसेच महिलांमध्ये वाढत असलेल्या शिक्षणाच्या प्रमाणामुळे महिला स्वतःच्या हक्कांसाठी जागृत झाल्या आहेत, त्यामुळे महिलांवरिल हिंसाचाराची नोंद वाढली आहे, म्हणून आकडेवारीही वाढतांना दिसत आहे. याचा अर्थ इतर राज्यांपेक्षा गुन्हे वाढत आहे असा काढू नये. त्यांच्याकडेही ह्या केसेस आहेत पण त्यांच्याकडे काळजीपूर्वक गुन्हे नोंदविले जात नाही असे यावरुन स्पष्ट होते.

केंद्रिय महिला आयोगाच्या २००२ च्या अहवालानुसार प्रत्येक २६ मिनिटाला एका स्त्रीचा विनयभंग होतो, प्रत्येक ३४ मिनिटाला एक बलात्काराचा गुन्हा दाखल होतो, प्रत्येक ४२ मिनिटाला एक लैंगिक अत्याचाराची घटना नोंदवली जाते, प्रत्येक ९३ मिनिटाला एक हुंडाबळी होतो.

स्त्रीयांसाठी अनेक कायदे आपल्या राज्यघटनेत आहेत त्याची यादी आपण पाहिली. तरीही एवढ्या स्त्रीया का मरतात? स्त्रीया मरतात तरी पोलिस स्टेशनची मदत

घेण्यासाठी का येत नाही? मुलीच्या मृत्यूनंतर मारणाऱ्यांना शिक्षा व्हावी म्हणून झगडणारे पालक जेव्हा मुलगी त्रासाबद्दल सांगत असते तेव्हाच का तिला मदत करत नाही, तेव्हाच त्या मारणाऱ्यांच्या तावडीतून तिला सोडवत का नाही? हे सर्व प्रश्न आपल्याला यात समजावून घ्यायचे आहेत.

## हिंसेची मानसिकता

हिंसा करणे किंवा सहन करणे ही एक मानसिकता आहे. ह्या मानसिकतेला खतपाणी घालणारी परिस्थिती मिळाली की हिंसा घडते. नवरा दरवेळेस किंवा प्रत्येक नवरा सशक्त असतो म्हणून मारतो हे पूर्णतः खरे नाही. बायकोला मारण्याची त्याची मानसिकता असते आणि शरीराने ती अशक्त असते म्हणून नवऱ्याला हिंसाचार करणे सहज जमते. आपण आपल्या कामात अनेक वेळा पाहिले असेल की नवरा बारिक, बुटका किंवा अशक्त असते म्हणून नवऱ्याला हिंसाचार करणे सहज जमते. आपण आपल्या कामात अनेक वेळा पाहिले असेल की नवरा बारीक, बुटका किंवा अशक्त आणि बायको त्याच्यापेक्षा सशक्त, उंच असूनही तो नवरा तिला मारतो. आपण अशा स्त्रियांना जर विचारलं की, तुम्ही असा मार का खाता, हात का धरत नाही? तर त्या म्हणतात, ''बाई , नवऱ्याचा हात कसा धरणार?''

एखादा नवरा बायकोला मारत नसेल तर त्याचे घरचे, तिच्या घरचे, आजूबाजूचे सर्वच कौतुकाने सांगतात की, तो कधीच बायकोला मारत नाही. यात विशेष काय आहे? बायकोला मारायचे नसतेच. पण बरेच नवरे मारत असल्यामुळे जे मारत नाही त्यांचे बरेच कौतुक होते. याचाच अर्थ हिंसा ही मानसिकता आहे.

जे पुरुष दुसऱ्यांना मारत नाही याचा अर्थ ते सशक्त नाही म्हणून मारत नाहीत असे नाही तर ते हिंसेच्या विरोधात आहेत म्हणून मारत नाहीत. शारीरिक क्षमता असूनही जी व्यक्ती दुसऱ्यांवर हिंसाचार करीत नाही ती खऱ्या अर्थाने अहिंसावादी असे महात्मा गांधी म्हणत. यासर्वां वरुन एकच गोष्ट लक्षात येते की हिंसा करणे आणि सहन करणे ही मानसिकता आहे.

## प्रकरण दुसरे

## कौटुंबिक हिंसाचार - व्याख्या

व्याख्या – कौटुंबिक हिंसाचारालाच 'सर्वात जवळच्या व्यक्तीकडून होणारा हिंसाचार' असेही म्हंटले जाते, कौटुंबिक हिंसाचार ही एक व्यापक संकल्पना आहे. काही देशांमध्ये यात मुलांवर होणारा, वृध्दांवर होणारा तसेच कुटंबातल्या इतर सदस्यांवर होणारा हिंसाचारही समाविष्ट केलेला आहे. कौटुंबिक हिंसाचारामध्ये पत्नीला होणारी मारहाण, तिचा मानसिक छळ, तिला गैरशब्द वापरले जाणे, याबरोबरच प्रत्यक्षात विवाहाशिवाय किंवा तत्सम् नातेसंबंधामुळे एकत्र राहणाऱ्या स्त्रीचाही या व्याख्येत

समावेश केला आहे.

१. इंग्लंडच्या मुलांसाठी आणि कुंटुंबासाठी असलेल्या न्यायालयाच्या मार्गदर्शक आणि मदत करणाऱ्या यंत्रणेने तयार केलेली व्याख्या. त्यांच्याकडे 'कौटुंबिक हिंसाचार विरोधी धोरण' आहे त्यात ही व्याख्या दिलेली आहे.

''आपल्या सत्तेच्या आणि नियंत्रणाच्या ताकदीचा गैरवापर करुन आपल्या जवळच्या व्यक्तींच्या अधिकारावर अतिक्रमण करण्याचा स्वभाव असणाऱ्या व्यक्तीने शारीरिक, लैंगिक, भावनिक, मानसिक कुठलेही कृत्य केले ज्यामुळे त्या नात्यातील मुलं, कोणतीही एक व्यक्ती, पूर्ण कुटुंब किंवा समाजावर विपरित परिणाम होतो अशा कृत्याला ज्यात धमकी देणे, त्रास देणे, संपत्तीचे नुकसान करणे, आर्थिक नुकसान किंवा आणि तशी भिती तयार करणे याचा समावेश होतो. त्याला कौटुंबिक हिंसाचार समजले जाते.''

२. एखाद्या स्त्रीला तिच्या कुंटुंबातील कोणीही ती स्त्री म्हणून तिच्या स्वातंत्र्यावर, आदरावर, निर्णय घेण्याच्या कुवतीवर गदा आणण्यासाठी केलेले कुठलेही कृत्य म्हणजे कौटुंबिक हिंसाचार होय. त्यासाठी त्यांनी जी न्यायालये सुरु केली त्याचे नाव 'स्त्रीयां वरील हिंसाचार विरुध्दचे कोर्ट' असेच दिले आहे. मारणारा पुरुष हा निष्पाप हे गृहितच मानले जात नाही. दोघांचे आमने सामने जाबजबाब होण्यापूर्वी हे कोर्ट त्या स्त्रीला बंद कोर्टात ऐकून घेऊन सक्षम करतात आणि त्या अत्याचार करणाऱ्या पुरुषाला संबंधित घरातून बाहेर काढले जाते; त्याचे पालक म्हणून असलेले मुलांची कस्टडी किंवा त्यांना भेटण्याचे अधिकार रद्द करतात. त्याचा शस्त्र परवाना रद्द केला जातो, नाकारला जातो.

३. भारतीय राज्यघटना : ४९८ कलमासाठी केलेली व्याख्या – कुठल्याही विवाहीत स्त्रीला तिच्या पतीकडून किंवा त्याच्याशी संबंधित व्यक्तींकडून कुठलाही शारीरिक, मानसिक क्रूर वर्तणूक झाल्यास त्याला 'कौटुंबिक हिंसाचार' म्हणून दाखल केले जाईल.

४. कौटुंबिक हिंसाचार पासून महिलांचे संरक्षण करणारा कायदा, २००५ – या कायद्यात कलम ३ मध्ये कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या देण्यात आली आहे. त्यानूसार 'प्रतिपक्षाची कोणतीही कृती, वागणूक, क्रिया किंवा वगळणूक ही काही निश्चित परिस्थितीमध्ये कौटुंबिक हिंसाचार समजण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले आहे. केवळ शारीरिक व मानसिक गैरवर्तणूक नसून, शाब्दिक, भावनिक, लैंगिक किंवा आर्थिक गैरवर्तणूकीचा समावेशही त्यात करण्यात आलं आहे'.

५. लिंगावर आधारित हिंसांचार– Gender based violence - स्त्रियांचे समाजात असेलेले दुय्यम स्थान यामुळे हिंसाचार होत असल्यामुळे कौटुंबिक हिंसाचाराला 'लिंगभेदावर आधारित हिंसाचार'असेही म्हटले जाते. या हिंसाचारात

येणाऱ्या घटना ह्या दोन पुरुषांमध्ये घडल्या किंवा कुंटुंब सोडून दोन कामगारांमध्ये, दोन शेजाऱ्यांमध्ये इतर ठिकाणी घडल्या तर कायद्याने त्याला गुन्हा मानून त्याची नोंद करण्याची तरतूद केली आहे.

वरील सर्व व्याख्यांचा अर्थ आहे की, स्त्रीला कोणीही कुठल्याही कारणाने, नात्याने मारहाण, कुठलाही हिंसाचार कायद्याने करु शकत नाही. तसे झाल्यास किंवा होण्याची शक्यता तिला वाटत असेल तर ती संबधित यंत्रणेकडे न्याय/मदत मागू शकते. तिला न्याय/मदत देणे हे त्या यंत्रमेचे आद्य कर्तव्य आहे. नुकत्याच पास झालेल्या कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायद्यानुसार अर्जदार स्त्री ही त्या व्यक्तीची बायको असण्याची आवश्यकता नाही. कोणीही स्त्री तिच्यावर होणाऱ्या अत्याचार संदर्भात संबंधित यंत्रणेकडे स्त्री तिच्यावर होणाऱ्या अत्याचार संदर्भात संबंधित यंत्रणेकडे तिच्यावर अत्याचार करणाऱ्या विरुध्द तक्रार/अर्ज देऊ शकते.

## प्रकरण तिसरे
## कौटुंबिक हिंसाचारचे प्रकार

कौटुंबिक हिंसाचारा पासून महिलांचे संरक्षण करणारा कायदा 2005 मध्ये येण्यापूर्वी न्याय मागण्यासाठी आलेल्या महिलेवर अन्याय झालेला आहे हे संबंधित यंत्रणेच्या लक्षात आणून देईपर्यंत त्या स्त्रीचा किंवा तिच्या बरोबर आलेल्यांचा श्रम, वेळ, पैसा जायचा. जोपर्यंत अर्जदार स्त्रीच्या अंगावर रक्त दिसत नाही, जबरदस्त मुका मार दिसत नाही किंवा त्या हिंसाचाराच्या गंभीर परिणामाने ती स्त्री पूर्णतः संपून जात नाही तोपर्यंत तिच्यावर अन्याय झाला आहे हे मान्य करायलाच ही यंत्रणा तयार नसते. पण आता या कायद्याने हिंसाचाराची व्याख्या आणि प्रकार याची सविस्तर माहिती देऊन त्या व्यतिरिक्तही अत्याचार असू शकतो असे म्हंटल्यामुळे कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या व्यापक झाली आहे. स्त्रीयांवर होणा–या हिंसाचारात काही पुरूष काहीही कारणांवरून मारतात तर काही पुरूष तिची चूक झाली होती म्हणून मारले असे सांगतात. काहीही कारणाने झालेला हिंसाचार हा हिंसाचारच आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. तिची चूक झाली हे ठरवायचे कोणी, तर पुरूषाने हा कुठला न्याय? आणि समजा चूक झाली तरि शिक्षा देण्याचा अधिकार पुरूषाला दिला कोणी? पुरूष चुकला तर बायको मारते का ?

**साधारणपणे खालीलप्रमाणे कौटुंबिक हिंसाचाराचे प्रकार पडतात –**

**१. शारीरिक हिंसाचार**– उदा. मारणे, चापट मारणे, ठोसा मारणे, चावणे, लाथ मारणे, चिमटा काढणे, ढकलणे (जोराचा धक्का मारणे) लोटणे किंवा कोणत्याही प्रकारची शारीरिक वेदना देणे किंवा इजा करणे.

**२. लैंगिक हिंसाचार**– उदा. बळजबरीने शारीरिक संभोग करणे, बळजबरीने अश्लील लेखन किंवा इतर बिभत्स साहित्य बघण्यास लावणे, त्या स्त्रीची अप्रतिष्ठा

करणारी कोणतीही लैंगिक स्वरूपाची कृती किंवा शिवीगाळ किंवा अपमान करणे किंवा इतर कोणतीही लैंगिक स्वरूपाची स्वागतार्ह नसलेली वर्तणूक करणे, मुलांचा लैंगिक वापर करणे.

यात सर्वात महत्वाची गोष्ट अशी की, कुठल्या घटनेमुळे त्या स्त्रीला अप्रतिष्ठित वाटते हयाची व्याख्या त्या स्त्रीने जी केली असेल तीच मान्य करायची आहे. एखादी कृती 'अ' स्त्रीला लैंगिक अप्रतिष्ठा देत असेल तर 'ब' स्त्रीला तसे वाटत नसेल, तर 'अ' चेही बरोबर आणि 'ब' चेही बरोबर. त्यांचे एकामेकींचे नियम स्वतंत्रपणे दोघींना लावायचे, त्याचे मिक्सिंग होणार नाही याची काळजी जाणिवपूर्वक घेतली पाहिजे.

स्त्रीया लैंगिक अत्याचाराबद्दल मोकळेपणाने बोलत नाही. लहानापणापासून त्या अवयवांबद्दल एवढी झाकापाक केलेली असते की हया विषयावर सार्वजनिक ठिकाणी बोलायचे नसते हेच ती शिकलेली असते. त्या स्त्रीने आपल्याशी मोकळेपणाने बोलावे यासाठी प्रायव्हसी (कम्फर्ट झोन) निर्माण केली पाहिजे. आपण आपले लक्ष तिच्यावर केंद्रित केले पाहिजे. तिच्याकडे सांगण्यासाठी भाषा नसते, त्यातही तिला मदत लागू शकते ती आपण दिली पाहिजे.

कौटुंबिक हिंसाचारा विरूद्ध घराबाहेर पडलेल्या एकूण स्त्रियांपैकी 50 टक्क्यांपेक्षा जास्त स्त्रिया लैंगिक हिंसाचाराच्या बळी असतात, परंतू त्या प्रमाणात त्यांच्या अर्जात हिंसाचाराच्या प्रकारात लैंगिक हिंसाचाराची नोंद आढळत नाही असे टाटा सामाजिक विज्ञान संस्थानच्या डॉ.निशी मित्रा यांनी त्यांच्या 'विवाहांतर्गत बलात्कार' या संशोधनात सिद्ध केले आहे. तेव्हा हा विषय किती गंभीर आहे याची जाणिव आपल्याला आली असेल.

कौटुंबिक हिंसाचारा विरूद्धच्या कायद्याच्या 'कौटुंबिक हिंसाचार घटना अहवाला'त लैंगिक हिंसाचार हा दुसराच मुद्दा आहे. तरि प्रत्यक्ष हा अहवाल भरून घेतांना तो मुद्दा अर्जाच्या शेवटी जेव्हा स्त्री बरोबर आपले मोकळेपणाने नाते तयार झालेले असेल तेव्हा भरून घेतला जावा. पण जर त्या अर्जदार स्त्रीने तिच्यावर झालेल्या लैंगिक अत्याचारा पासूनच बोलायला सुरूवात केली तर मात्र आपणही मोकळेपणाने तो मुद्दा आधी घ्यावा.

याशिवाय त्या स्त्रीच्या इच्छेविरूद्ध इतर पुरूषांशी संबंध ठेवण्यासाठी बळजबरी करणे, अनैसर्गिक मार्गाने संबंध ठेवणे इ; खरतर तिच्या इच्छेशिवाय केलेली प्रत्येक कृती लैंगिक हिंसाचार आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

**३. शाब्दिक किंवा भावनिक हिंसाचार** – उदा. अपमान, शिवीगाळ, त्या स्त्रीचे चारित्र्य किंवा वर्तणूक इत्यादीवर आरोप करणे, मुलगा झाला नाही म्हणून आरोप करणे, हुंडा आणला नाही म्हणून अपमान करणे इ. शाळा–महाविद्यालये किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये जाण्यास त्या स्त्रीला किंवा तिच्या ताब्यातील मुलाला प्रतिबंध करणे, त्या स्त्रीला नोकरी करण्यास प्रतिबंध करणे, नोकरी सोडून द्यावी म्हणून

त्या स्त्रीवर बळजबरी करणे, त्या स्त्रीला किंवा तिच्या ताब्यातील मुलांना घराबाहेर जाण्यास प्रतिबंध करणे, सर्वसाधारण घटनाक्रमात त्या स्त्रीला एखाद्या व्यक्तीस भेटण्यास प्रतिबंध करणे, त्या स्त्रीची इच्छा नसतांना सुद्धा लग्न करण्यासाठी बळजबरी करणे, त्या स्त्रीला तिच्या पसंतीच्या व्यक्तीशी लग्न करण्यास प्रतिबंध करणे, त्याच्या / त्यांच्या पसंतीच्या विशिष्ट व्यक्तीशी लग्न करण्यासाठी त्या स्त्रीवर बळजबरी करणे, आत्महत्या करण्याची धमकी देणे, ***शिवाय इतर कोणताही शाब्दिक किंवा भावनिक हिंसाचार करणे.***

**४. आर्थिक हिंसाचार** — उदा. त्या स्त्रीच्या किंवा तिच्या मुलांच्या निर्वाहासाठी पैसे न देणे, त्या स्त्रीला किंवा तिच्या मुलांना अन्न—वस्त्र व औषधे इत्यादि न देणे, त्या स्त्रीला नोकरी करण्यास प्रतिबंध करणे / परवानगी न देणे / अडथळा निर्माण करणे, त्या स्त्रीचे वेतन / मजुरी इत्यादि पासूनचे उत्पन्न हिरावून घेणे किंवा तिला ते उत्पन्न वापरू न देणे, तिला तिच्या राहत्या घरातून बळजबरी बाहेर काढणे, तिला घराच्या कोणत्याही भागात प्रवेश करण्यास किंवा त्याचा वापर करण्यास मज्जाव करणे, कपडे किंवा वस्तू किंवा सर्वसाधारण घरगुती वापराच्या वस्तू वापरण्यास तिला मनाई करणे, भाडयाचे घर असेल तर भाडे इत्यादि न देणे.

## प्रकरण चौथे
## कौटुंबिक हिंसाचारचे परिणाम

कौटुंबिक हिंसाचाराच्या बळी झालेल्या स्त्रीया किंवा मुलांवरूनही त्यांच्यावर काय प्रकारचा हिंसाचार झाला आहे याचा अंदाज येतो. हिसांचार करणा—याच्या हेतूपेक्षा हिंसाचारग्रस्त व्यक्तीवर झालेला परिणाम हा आपण जास्त गंभीर पणे पाहिला पाहिजे. उदा. एखादी ओरडून बोलणारी व्यक्ती म्हणेल माझा त्या स्त्रीला किंवा त्या मुलाला घाबरवण्याचा हेतू नव्हता, पण त्याच्या ओरडण्याने ती स्त्री किंवा ते मुल घाबरत असेल तर त्या व्यक्तीचे ओरडणे ही गंभीर घटना आहे, तिची दखल घेतलीच पाहिजे कौटुंबिक हिंसाचाराचा परिणाम स्त्रियांवर दिसतो, मुलांवर दिसतो, समाजात दिसतो तसाच तो हिंसाचार करणा—यावरही दिसतो. परिणामांची काही उदाहरण आपण बघू या :

**१. शारीरिक** —

१. अपंगत्व - तात्पुरत/कायमस्वरूपी येऊ शकते.
२. कानामागे मारल्यामुळे ऐकायला न येणे/ बहिरेपण येणे,
३. गर्भपात होणे.
४. नको असलेले गरोदरपण.
५. जखमी होणे- आपण पाहतो की स्त्रीयांना सतत काहीना काही जखमा असतात.
६. एखादा अवयव निकामी होणे.

७. सतत उपासमारीमुळे भूक न लागणे, कुपोषणामुळे अषक्तपणा, इतरही आजार बळावणे.

८. मृत्यू होणे - १९ ते ३५ वयोगटातल्या स्त्रीयांच्या मृत्यूदरात नैसर्गिक मृत्यूपेक्षा कौटुंबिक हिंसाचारामुळे झालेल्या मृत्यूंचे प्रमाण अधिक आहे.

**२. मानसिक परिणाम –**

१. मानसिक अपंगत्व येणे.

२. मानसिक संतुलन बिघडणे- अशा व्यक्ती सतत बोलतात, असंबंध्द बोलतात, मध्येच हसतात तर मध्येच रडतात.

३. आत्मविष्वास गमावणे- अशा व्यक्ती जेव्हा बोलत असतात तेव्हा ऐकणा-याकडे न पाहता इतरत्र पाहतात, कुठेही एकटं जाण्याची हिंमत नसते, नियमित करत असलेली कामेही नंतर करू शकत नाही.

४. मानसिक रूग्ण होतात - अंगात येणे, गर्दीला घाबरणे, बोलताना सतत घसा-ओठ-जीभ कोरडी पडणे इ.

५. सतत आजारी - मानसिक शांतता नसल्यामुळे अशा व्यक्ती सतत आजारी पडतात औषधोपचार करूनही किरकोळ वाटणारे आजारही त्यांचे बरे होत नाही. सततच्या हिंसाचारामुळे सतत पाठदुःखी, कंबरदुःखी हे तर स्त्रीयांमध्ये सहज आढळणारे परिणाम आहे.

६. सतत भिती - जरा आवाज झाला तरी अशाा व्यक्ती लगेच घाबरतात.

७. जागतिक बॅंकेच्या एका अहवालानुसार स्त्रीयांच्या आयुष्यात ऐन तारूण्यातले (१५ ते ४४ वयातले) ५ ते ७ वर्षे हे हिंसाचाराला तोंड देण्यात जातात. त्यामुळे पुढे जगण्याची उम्मीदच संपते. पुढचे आयुष्य त्या हिंसाचारामुळे झालेले परिणाम निस्तरण्यात किंवा परत हिंसाचार होणार नाही ना हया भितीत जातात.

८. व्यसनांच्या आहारी जाऊ शकतात. मार खाणा-या स्त्रीवर नंतर परिणाम होतो पण मारणा-या पुरूषावर मात्र आधीच परिणाम सुरू झालेला असतो, त्यामुळेच ते मारायला तयार होतात. या त्यांच्या मानसिक कमकुवत पणामुळे मग ते व्यसन दारूच, जुगाराचे असेल त्यात अडकत जातात. तसेच स्त्रीयांवरही याचा परिणाम होतो त्या तासनूतास मशेरीने दात घासतात किंवा तंबाखू खातात

**३. शाब्दिक / भावनिक परिणाम –**

ज्या स्त्रीला सतत अश्लील शब्द वापरून तिचा अपमान होत असेल तर कालांतराने तिचीही संवेदनशिलता संपते आणि मग तीही तेच शब्द वापरते किंवा त्या शब्दांसंदर्भात एवढी घृणा बसते की दुस–याने कोणी तसे शब्द वापरले तरी ऐकणा–या स्त्रीला शिसारी येते, मळमळ होते.

**४. आर्थिक परिणाम –**

१. हातातले पैसे जाणे.
२. नोकरी जाणे.)
३. काही दिवस त्या स्त्रीने काम केलेले असते, नवरा नंतर कामावर जाऊ देत नाही, ज्यामुळे. तिने जितके दिवस काम केले त्याचे पैसेही मिळत नाही आणि तिची कामावरची सिनॅरिटीही जाते. कामावर सातत्य नाही म्हणून तिच्यावरचा विश्वास उडतो आणि पुढे ती त्या कामातली कितीही तज्ञ असली तरी तिला ते काम मिळत नाही.

**५. लैंगिक परिणाम –**

१. लैंगिक अवयवांना तात्पुरती/ कायमस्वरूपी जखम होणे.
२. लैंगिक संबंधाबाबत भिती बसणे.
३. लैंगिक संबंध करण्याचा आत्मविश्वास गमावणे.
४. एचआयव्ही, एडस्, गुप्तरोगा सारख्या रोगांची लागण होणे

वरील परिणाम हे उदाहरणा दाखल आहेत. आपल्याकडे येणारी स्त्री ही स्वतंत्र आहे, त्यामुळे तिच्यावर झालेला हिंसाचार हा प्रत्येकी वेगळा असू शकतो तसेच त्याचे परिणामही प्रत्येकीचे वेगळे असू शकतात. त्या स्त्रीची सामाजिक, कौटुंबिक जडणघडण कशी झाली आहे यावर हिंसाचाराचे परिणाम अवलंबून असतात. एखादया स्त्रीला ‘मारले याचे काही नाही, पण आईवर शिवी कशाला द्यायची’ अस वाटेल तर एखादी, ‘त्याच तोंड आहे किती का शिव्या देईना, पण अंगावर हात कशाला करायचा?’ असे म्हणेल. एखादी स्त्री मारहाणीमुळे तिची काय अवस्था झाली हे इतरानांही समजावी, मारहाण किती गंभीर झाली याचा अंदाज सबंधितांना यावा यासाठी आहे त्या मारहाणीच्या स्थितीत तशीच आपल्याकडे किंवा पोलिस स्टेशनमध्ये येऊ शकते. त्या मागची तिची भावना समजावून घेतली पाहिजे.

घरी त्यांना कोणी बोलू देत नाही, त्यांच्या प्रत्येक म्हणण्याची टिंगल केली जाते किंवा अपमान केला जातो. आपणही तिची दखल घेतली नाही, तिची टिंगल केली, ‘ओरडून बोलू नकोस गं,’ ‘बास आता कळल मला तुला किती मारलं आहे ते’ किंवा ‘घरी अशीच आरडाओरड करीत असशील, मग मार पडेल नाही तर काय होणार?’ असे सगळे डायलॉग ऐकल्यावर त्या स्त्रीला हताश वाटणे साहजिक आहे. सगळयाच यंत्रणा अशाच वागल्या तर त्या स्त्रीने जायचं कुठे?

**सामाजिक परिणाम** – कौटुंबिक हिंसाचार हा जरी घरगुती प्रश्न आहे असे वाटत असले तरी खरतर तो सार्वजनिकच प्रश्न आहे, त्यामुळे त्याचे समाजावरही परिणाम झालेले दिसतात, ते पुढिलप्रमाणे :-

१. मुलीचा गर्भ आहे म्हणून गर्भपात करण्याचे प्रमाण वाढते आहे. पुरूषांच्या

तुलनेत स्त्रीयांची कमी झालेली संख्या हा सामाजिक दृष्टया हिंसाचाराचा मोठा परिणाम आहे.

२. स्त्रीया हिंसाचारात अडकल्यामुळे त्या देशाच्या विकास प्रक्रियेतून बाहेर फेकल्या गेल्या आणि त्यामुळे देशाचा विकास दरही कमी कमी होतो आहे. नागपूरच्या शासकिय वैद्यकिय महाविद्यालयाने 'हिंसाचारामुळे देशाचे होणारे आर्थिक नुकसान' याचा अभ्यास मांडला आहे. त्यांच्या मते जेव्हा एका बाईला मारहाण होते तेव्हा पोलिस, कोर्ट, तिच्यावर उपचार करणारी यंत्रणा, त्या बातम्या छापल्या गेल्यामुळे मिडियातली जागा आणि लोकांचे होणारे डायव्हरशन, तसेच जो पुरूष मारहाण करतो त्याचे कामावर लक्ष लागत नाही म्हणजेच त्याची उत्पादकता घटते, मारहाणीमुळे बाई जखमी झाल्या असतील किंवा मानसिकदृष्टया डिस्टर्ब झाल्या असतील त्यामुळे त्यांचेही कामावर लक्ष लागत नाही म्हणजे त्यांचीही उत्पादकता कमी होते यासर्व गोष्टी खर्ची पडतात. स्त्रीयांना मारहाण झाली नाही तर वरिल सर्व यंत्रणा आपापली कामे करू शकतात शिवाय शासनाचे पैसेही वाचतील.

३. महिलांवरिल हिंसाचार हा फक्त त्या स्त्रीवर झालेला हिंसाचार नसून भारतीय राज्य घटनेने प्रत्येकाला शांततेने जिवन जगण्याचा अधिकार दिला आहे, हया अधिकाराच कोणी उल्लंघन करित असेल तर त्यांना त्यापासून रोखण्यासाठीची जबाबदारी पोलिस यंत्रणेवर तसेच शासनावर टाकली आहे, त्यामुळे स्त्रीयांवर होणारा हिंसाचार हा त्या शासनाचा, पोलिसांचा आणि भारतीय राज्यघटनेचा अवमान आहे.

## प्रकरण पाचवे
## हिंसेबाबतचे गैरसमज

हिंसेबाबत अनेक गैरसमज आपल्या समाजात दिसून येतात काही वेळेस ते गैरसमज इतके आपल्या अंगवळणी पडतात की ते नैसर्गिक आहेत असेच आपल्याला वाटते. सर्वच गैरसमज या प्रकरणात आले असतील असे नाही. उदाहरणादाखल काही गैरसमज खाली दिले आहेत. कार्यकर्त्यांनी आपल्या रोजच्या अनुभवातून ही यादी वाढवत न्यावी अशी अपेक्षा आहे.

**हिंसेबाबतचे गैरसमज :—**

१. किरकोळ मारहाण बाईला आवडते - ''बाई, तिला आवडत मारलेले, त्याशिवाय तिला जेवणच जात नाही किंवा झोपच येत नाही.'' हा डायलॉग तर आपण दिवसातून दहावेळा तरी ऐकत असतो. मार खाणा-या अनेक बायकांना मी हा प्रश्न विचारला, पण एकीचेही होकारार्थी उत्तर आले नाही. पण मग हा डॉयलॉग कुठून, कसा आला आणि कसा टिकला. तर जे स्त्रीयांना ताब्यातच ठेवले पाहिजे अशा मानसिकतेचे लोक आहेत त्यांनी हा गैरसमज निर्माण केला आहे, सतत म्हणत म्हणत त्याचा प्रचार-प्रसारही केला आहे. कुठल्याही स्त्रीवर उठलेला पहिला हात किंवा फटका याने तिच्या मनात रागच उत्पन्न झालेला दिसतो. तिला स्वतःचा अपमान वाटलेला असतो. त्याची तीव्रता कमी

व्हावी, त्याला काय एवढी किंमत दयायची अस एकीकडे म्हणायचे आणि स्त्रीचा अपमान करण्याचे साध्यही मिळवायचे यासाठी किरकोळ मारहाण बाईला आवडते किंवा दोन फटके मारले तरी ती हसतच होती असे गैरसमज निर्माण केले जातात. वरचे विधान मला सांगणा-या एका नव-याच्या बायकोला ''तू मारल्यानंतर का हसते?'' हे जेव्हा विचारले तेव्हा तिने फार मार्मिक उत्तर दिले. ती म्हणाली, ''बाई, मी हसत नव्हते, मला मारण्याचा त्रास होतो, बास आता हे त्याला सूचवायचा प्रयत्न करत होते, त्याला कळले नाही की त्याने कळूनही न कळल्यासारखे केले हे माझ्या लक्षात आले नाही.'' तिचे शेवटचे वाक्य हे आपल्यासाठी अधिक विचाराला चालना देणारे आहे.

२. स्त्रीयांना नियंत्रणात ठेवणे आवश्यक असते - स्त्रीया या निसर्गतः कमकुवत, नाजूक असतात, त्यांना स्वतःची चाणाक्ष बुद्धी नसल्यामुळे त्या पटकन कोणाच्याही बहकाव्यात येतात, त्यांना मोकळ सोडल तर कुठलाही पुरूष त्यांच्याशी बळजबरी संभोग करेल, ज्यामुळे अनौरस मुलं जन्माला येतील, ज्यामुळे खानदानाच्या बीजाची शुद्धता नष्ट होऊन समाजात अराजकता पसरेल हे सर्व टाळायचे असेल तर तिच्यावर लक्ष ठेवण्यासाठी, नियंत्रण ठेवण्यासाठी लहानपणी वडिल, मोठी झाल्यावर नवरा आणि वृद्ध झाल्यावर मुलगा अशी कुठल्या न कुठल्या पुरूशाची गरज भासते असे समाजात विविध पद्धतीने मांडले जाते. अशा या नियंत्रणवादी समाजाचे वर्णन करताना एक स्त्री वादी कवियत्री लिहिते,

''लहानपणामध्ये बापाच नाव,
लगीन झाल्यावर पती हा देव,
म्हातारपणामध्ये पोरांना भ्याव,
असा जीवनी हा सेवाभाव''

वरची हिंसेबाबतची पुरूषवादी भूमिका ही मानवनिर्मित आहे हे आपल्याला पदोपदी लक्षात येईल. स्त्री जमात चाणाक्ष नसती तर तिने शेतीचा शोध कसा लावला असता? तिच्या अंगात शक्ती नसती तर तिने नऊ महिने गर्भ पोटात सांभाळूच शकली नसती. घरात एकटीच असलेली बालिका, रात्रीची डयूटी संपवून घाई घाई घरी जाणारी स्त्री यांच्या एकटेपणाचा गैरफायदा घेऊन बलात्कार करणा-यांना नियंत्रणात आणण्याऐवजी सर्व स्त्री जमातीलाच घरात, पदरात, बुरख्यात झाकून टाकण्याचा पुरूषसत्ताक समाजाचा डाव आपण समजावून घेतला पाहिजे. त्याबरोबरच प्रत्येक पुरूष हा स्त्रीवर अत्याचार करण्यासाठीच जन्मला आहे ही भिती मुलींच्या डोक्यात घालता कामा नये यासाठी आपण काम करायला हवे. मुलांनी रस्त्यात छेडले तर काय करावे यासंबंधी मुलींशी मोकळेपणाने चर्चा करावी, म्हणजे त्या स्वतःच स्वतःचे संरक्षण करू शकतील. या ऐवजी या रस्त्याने जावू नको असे सांगून हळूहळू स्त्रीयांच्या संचार स्वातंत्र्यावर (mobility) गदा आणली जाते हे

आपण लक्षात घेतले पाहिजे. लहानपणापासून पुरूषांबद्दलची भिती मनात घालायची, तिला पुरेसे अन्न न देता अशक्त बनवायचे, मासिक पाळी सारख्या नैसर्गिक चक्राबद्दल गैरसमज तिच्या डोक्यात घालून स्त्रीयांना शारीरिक-मानसिक-भावनिक कमकुवत ठेवायचे आणि मग तिच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी गैरसमज पसरवयाचे ही निती थांबवायची असेल तर स्त्रीयांना सर्व प्रकारचे शिक्षण, पुरेसे अन्न आणि व्यायाम आवश्यक आहे याचा प्रचार-प्रसार आपण केला पाहिजे. म्हणूनच स्त्रीवादी कवियत्री वरील गाण्यात शेवटी म्हणते,


''बदलाया बंड मी करिते,<br>
स्त्री दास्याचा तुरूंग फोडिते।।''

३. ''दिवसभर बायकोशी कसही वागलं तरी चालतं, रात्री तिला जवळ घेतल की, ती सर्व माफ करते.'' - हा एक मोठा हिंसेबद्दलचा गैरसमज आहे. दिवसभर तिचा अपमान करायचा, तिला मारायचे मग रात्री ती शारीरिक संबंध आनंदाने कशी करणार? याची जाणिव बायकोला मारणा-यांना व्यवस्थित आहे आणि म्हणूनच त्यांनी हा गैरसमज पसरवलेला आहे. टाटा सामाजिक विज्ञान संस्थानच्या डॉ.निशी मित्रा यांनी त्यांच्या 'स्त्रीयांवरिल विवाहांतर्गत होणारे बलात्कार' या संशोधनाच्या वेळी जेव्हा स्त्रियांना वरील वाक्य सांगितले तेव्हा एकाही स्त्रीने या वाक्याचे समर्थन केले नाही. दिवसभर त्रास भोगूनही रात्री शारीरिक संबंधांना स्त्रीया तयार झाल्या नाही तर ''तुझे कोणाशी काही असेल म्हणून मला हात लावू देत नाही.'' ''कोणासाठी ---- सांभाळून ठेवते.'' असे आरोप केले जातात, ते आरोप होऊ नये म्हणून स्त्रिया होणा-या शारीरिक अत्याचाराला थांबवण्या ऐवजी ती वेळ मारून नेण्यासाठी तटस्थ पडून राहतात असे अनुभव स्त्रियांनी या संशोधनाच्या मुलाखतीच्या वेळेस सांगितले.

४. हिंसेचा स्त्रीयांना राग नसतो, म्हणून तर त्या नव-याबरोबर एवढा मार खावूनही राहतात - मार खाल्ल्यानंतर, सर्व प्रकारचा त्रास होऊनही स्त्रीया घर सोडत नाही हे दिसणारं दृष्य खर आहे, पण त्यामागे त्यांना ती हिंसा आवडते किंवा त्यांनी हिंसा करणा-यांना माफ केले आहे असे नाही, तर त्यांना दुसरा पर्याय उपलब्ध नसतो. स्वतःच पुरेस शिक्षण नाही की ज्याच्या बळावर त्या उत्पन्न मिळवू शकतील, माहेरी आधार नसतो, माहेरची आर्थिक परिस्थिती चांगली नसते, मुलं बरोबर असतात, त्यांना घेऊन कुठे जाणार? काय खाऊ घालणार? त्यांच शिक्षण कसे करणार? हे आणि असे अनेक प्रश्न तिच्या समोर आ वासून उभे असतात; या प्रश्नांना सामोरे कसे जायचे याचा विषय कधीच आयुष्यात एकेलेला नसतो, याआधी घरातली कोणी स्त्री सासरच्या जाचाला कंटाळून माहेरी परत आली असेल तर तिचे हाल पाहिलेले असतात. त्यामुळे कितीही त्रास झाला तरि खानदानीच्या इज्जतीसाठी ती तिथेच राहणे पसंत करते. हिंसाचारग्रस्त महिलांच्या तात्पुरत्या निवासासाठी ज्या शासकिय, निमशासकिय किंवा खाजगी संस्थांच्या व्यवस्था आहेत त्या फारच वाईट अवस्थेत आहेत. नव-याचा मार वाचवण्यासाठी बाई या

आधारगृहांचा आधार घेते तर ही आधारगृह तिच्या नव-याला तिथेच बोलावून घेतात, अनेकांसमोर एकत्र बैठक करतात जिथं बाई तिच्यावर झालेला अत्याचार मोकळेपणाने बोलू शकत नाही, मग 'अग संसार आहे किरकोळ खटके तर उडणारच' अस म्हणून तिला त्याच मारणा-या नव-याबरोबर बळजबरी समझोता करून पाठविले जाते आणि आम्ही बघा कसे जास्तीत जास्त समझोते केले म्हणून पाठ थोपटून घेतली जाते. यासर्व परिस्थितीमुळे स्त्री हताश होते आणि कुठलाच मार्ग न सापडल्यामुळे नव-याकडेच राहणे पसंत करते. नवरा कसाही असला तरि त्याच्याच कडे राहणा-या बाईची समाजात होणारी वाहवा आणि घराण्याची तिच्या नांदण्या बरोबर लावलेली जोडी टिकवण्यासाठी त्या नव-याने कितीही मारले, झापात ठेवले, तो दुस-या बाई बरोबर राहिला, त्याने घर खर्चाला पैसे दिले नाही तरी त्याच्याच बरोबर राहणे पसंत करते.

## प्रकरण सहावे
## हिंसाचाराची सायकल थियरी



आपल्या सेंटर मध्ये किंवा कक्षात येणारे स्त्री पुरूष त्यांच्या जीवनसाथी बरोबरच्या नातेसंबंधात कुठल्या पायरीवर आहे हे ओळखण्यासाठी हिंसाचार चक्र थियरीचा उपयोग होतो. खूप वेळा काल तावातावाने बोलणारी, काहीही करा पण माझ्या नव-याला शिक्षा करा असे म्हणणारी स्त्री दुस-या दिवशी आपल्याला येऊन शांतपणे सांगते की, ताई माझा अर्ज थांबवा बर का, काल रागाच्या भरात तुम्हांला काय काय सांगितले काय माहिती, माझं ही जरा चुकलेच, आधीच ते कामावरून दमून आले होते, बोलले असतील चिडून पण मी कशाला तोंडी लागायचे? आपण तर पाहातच राहतो, अचानक काय झालं हेच कळत नाही. आपण समजुन घेतले पाहिजे की आता त्यांच्यात हनीमून स्टेज सुरू आहे आपल्या स्त्रीची ही स्थिती समजली की तिच्या बरोबर काम करणे सोपे जाते. पहिल्या स्टेजमध्येच स्त्री आपल्याकडे आली असेल तर तिला मारहाण होऊ नये यासाठी ती काय काय करू शकते म्हणजे तिची पूर्वतयारी करून घेऊ शकतो. तिची केस हिस्ट्री तिने लिहावी यासाठी तिला तयार करू शकतो. याच काळात महत्वाचे कागदपत्र सुरक्षित जागी ठेवण्यासाठी तिला सांगू शकतो, म्हणून हे हिंसाचाराचे चक्र समजणे कार्यकर्त्यांना आवश्यक आहे.

## प्रकरण सातवे
## कार्यकर्तीची किंवा कार्यकर्त्यांची भूमिका

हिंसाचार नक्की थांबतो, तो थांबवता येतो हा विश्वास आधी आपण आपल्यात वाढवला पाहिजे. मनुष्य जेव्हा रानटी अवस्थेत होता तेव्हा अग्नी टिकवण्यासाठी, समूहाची जबाबदारी म्हणून स्त्रीया घरात राहत असत. आता आपण हवा तेव्हा, हवा तसा, हवा तिथं आणि हवा तेवढा अग्नी प्रज्वलित करण्याचे शास्त्र शिकलो आहे. मग स्त्रियांना घरात डांबण्याचं कारण काय? हा प्रश्न आपल्या डोक्यात निर्माण होऊ लागला की त्यावरचे उपाय डोळयासमोर येण्याची शक्यता वाढते. त्यापैकी काही उपाय उदाहरणा दाखल खाली दिले आहेत.

१. कुठलाही किंवा कसाही **हिंसाचार हा कायद्याने गुन्हा आहे** हे आधी आपण पटवून घेतले पाहिजे, मान्य केले पाहिजे. आपण हिंसाचाराच्या विरोधात आहेत हे आपल्या वागण्या बोलण्यातून सतत व्यक्त झाले पाहिजे हिंसाचार करणा-या व्यक्तीच्या हे जाणिवपूर्वक लक्षात आणून दिले पाहिजे.

२. मानसिक आधार - हिंसाचार झालेल्या स्त्रीला प्रथम दिलासा द्या की, ती योग्य जागी आली असून तिला सर्व प्रकारचे सहाय्य मिळेल, तिच्यावरचा हिंसाचार प्रयत्नांनी थांबेल.

३. वैद्यकिय उपचार - तिची मानसिक तयारी असेल तरी, आणि मानसिक तयारी नसेल आणि उपचाराची आवश्यकता भासत असेल तर तिची उपचारासाठी मानसिकता तयार करून प्रथम तिच्या उपचाराची व्यवस्था केली पाहिजे. जो काही उपचार घेतला

असेल त्याचे सर्टिफिकेट घ्यायला विसरू नका. त्या सर्टिफिकेट मध्ये झालेल्या जखमा हया कौटुंबिक हिंसाचारामुळे म्हणजे जी घटना घडली असेल, त्यामुळे झाल्या आहेत हे स्पष्ट होण्यासाठी ज्यांनी ज्यांनी मारलं त्यांची नाव येतील याकडे लक्ष दयायला हवे. तिथे असलेले डॉक्टर त्यासाठी तयार नसतात, तेव्हा त्यांच्याबरोबर काम करणे आवश्यक असते.आम्ही फक्त मेडीकल सर्टिफिकेट देतो, बाकीच्या माहितीशी आमचा काहीही संबंध नाही असे दवाखान्यातले लोक सांगतात. अशा वेळेस त्यांच्याशी बोलून त्यांना तयार करायला हवे.

४. घटनांची नोंद करणे - ती स्त्री आपल्याकडे किंवा संबंधित यंत्रणेकडे (पोलिस स्टेशन किंवा कोर्ट) अर्ज नोंदवायला तयार असेल तर त्या अर्जात शक्य असेल तर तिच्या अक्षरात, तिच्याच भाषेत हिंसाचाराच्या घटनांचा वृतांत जितका सविस्तर, नेमका लिहिता येईल तेवढा लिहिला जातो आहे ना याकडे लक्ष द्यायला हवे. त्या स्त्रीचे कुठेही अर्ज नोंदवण्याची इच्छा नसेल फक्त तुमच्याशी बोलण्यासाठी त्या आलेल्या असतील तरी त्यांना आपल्याकडे 'फक्त लिहून द्या, आम्ही काहीही कार्यवाही करणार नाही, पण पुढे तुम्हांला केस हिस्ट्रीसाठी या अर्जाचा उपयोग होईन' असे सांगून सविस्तर अर्ज लिहून ठेवला पाहिजे. त्यासाठीही त्या तयार नसतील तर त्यांना त्यांच्या डायरीत लिहून ठेवायला सांगा, माहेरच्यांना किंवा मित्रमैत्रिणींना किंवा जवळच्यांना पत्राने कळवायला सांगा. त्या बाई त्यादिवशी आपल्याकडे येऊन गेल्या याची सविस्तर नोंद आपल्याकडे करणे आवश्यक आहे. काही संस्था, संघटनांनी त्यासाठी एक स्वतंत्र नोद वही/ रजिस्टर ठेवले आहे.

कुठलाही जीवघेणा हिंसाचार अचानक होत नाही, त्याची सुरूवात कुठंतरी कुरबुरी मध्ये असतेच. त्यामुळेच किरकोळ वाटणा-या घटनांचीही नोंद असणे आवश्यक आहे. अशा सुरूवातीच्या घटनांची नोंद नसली की मग झालेली मारहाण ही पहिलीच घटना आहे असे मोजून सर्वजण एकदा त्याला माफ कर अस सुचवतात. त्यामुळे त्या स्त्रीचा हिंसाचार थांबू शकतो यावरचा विश्वास उडतो हिंसाचाराच्या घटना तेव्हाच्या तेव्हा लिहिल्यामुळे तपशिलांची नोंद होते, नाहीतर नंतर काही गोष्टी आठवतात काही आठवत नाही त्यामुळे माहितीत निर्माण झालेल्या गॅपचा फायदा हिंसाचार करणा-यांना होतो.

हिंसाचाराच्या घटनेची नोंद दोन कारणांसाठी अत्यंत महत्वाची आहे. एक म्हणजे कायदेशिर दृष्टया केस हिस्ट्री म्हणून दुसरे कारण असे की, जेव्हा कुठलीही हिंसाचारग्रस्त व्यक्ती त्या घटनेचा वृतांत लिहिते तेव्हा तिच्या नेणिवेतल्या मेंदूला (uncontious mind) ती घटना लक्षात ठेवण्यासाठी विषेश प्रयत्न करावे लागतात. ती माहिती सांभाळण्यासाठी लागणारी शक्ती त्या मेंदूची वाचल्यामुळे ती उर्जा तो मेंदू नविन कल्पना तयार करण्यासाठी वापरू शकतो, ज्यामुळे त्या स्त्रीला हिंसाचारातून बाहेर पडण्याचा नविन मार्ग सापडल्यामुळे ती आनंदी बनते. हिंसाचाराची घटना जेव्हा ती स्त्री मनातच ठेवते तेव्हा त्या घटनेने तिचा सर्व मेंदू व्यापून जातो, त्यामुळे तिला ती घटना अत्यंत गंभीर, अशक्य - त्यावर उपायच निघू शकत नाही असे वाटायला लागते. त्या उलट जेव्हा ती

लिहिते किंवा सांगते तेव्हा शास्त्रषुद्ध पद्धतीने त्या समस्येचे छोटे छोटे भाग करून, ती स्वतः त्यावरचे उपाय शोधून ते अंमलात आणू शकते, ज्यामुळे आपण हिंसाचारातून बाहेर पडू शकतो यावरचा तिचा विश्वास वाढतो.

या तिने दिलेल्या अर्जाला तिच्या आयुष्यात अत्यंत महत्व असते हे लक्षात ठेऊन आपणही ते महत्व जपले पाहिजे. तिने तिच्या आयुष्याचे सर्वात महत्वाचे, सिक्रेट आपल्याकडे त्या अर्जाच्या निमित्ताने दिलेले असते. तिची व्यक्ती म्हणून प्रायव्हसी राखण्यासाठी तो अर्ज योग्य त्या ठिकाणी जपून ठेवला पाहिजे. ती काही स्टोरी नाही की कोणीही या आणि टाईमपास म्हणून वाचत बसा. अर्ज कधीही, कुठल्याही संदर्भात आवश्यक असू शकतो म्हणून त्याचे फाईलिंग, त्यावरच्या नोंदी म्हणजे नंबर इ. तितकेच महत्वाचे आहे.

५. पूर्वग्रह नको - हिंसाचारग्रस्त व्यक्ती किंवा अत्याचार करणारी व्यक्ती या दोन्हींच्या बाबतीत कुठल्याही प्रकारचा पूर्वग्रह असता कामा नये. नाहीतर आपण कोणालाच समजावून घेऊ शकत नाही याअर्थाने न्याय देऊ शकत नाही. उदा. मला माहित आहे हया बाई भांडकुदळच आहे, यांनीच नव-या बरोबर भांडण सुरू केले असेल किंवा हया पुरूषाला मी ओळखते, तो खूप हुषार आणि सर्वांना समजावून घेणारा आहे, तो असा बायकोला मारूच शकत नाही किंवा कुठल्याही स्त्रीचा लैंगिक छळ करू शकत नाही.

६. नॉन जजमेंटल ॲटिटयूड - म्हणजे कुठलाही अर्ज वाचताना, कोणाच ऐकत असताना किंवा दोन लोकांची एकत्र बैठक घेत असतांना सांगणा-यांना विचार करायला भाग पाडायचे असते आपण त्यांना न्यायाधीशांसारखे निकाल- आदेश द्यायचे नसतात.

७. सोशलवर्क डिग्रीचे शिक्षण घेतांना आपण समाजकार्याचे जे जे तत्व शिकलो ते सर्व डोळया समोर ठेवून अंमलात आणले की आपण ब-यापैकी स्त्रीच्या मनात आपल्याबद्दल 'आपण योग्य ठिकाणी आलो आहोत' हा विश्वास निर्माण करू शकतो.

८. पूर्वतयारी - हिंसाचारग्रस्त व्यक्ती आपल्याकडून जेव्हा परत जाते तेव्हा लगेच किंवा काही काळाने तिच्यावर हिंसाचार परत होऊ शकतो हे लक्षात घेऊन अशी घटना परत घडेल तेव्हा त्या स्त्रीने काय काय करावे यासाठीची तिची पूर्वतयारी करून घेणे आवश्यक असते. उदा. मार कसा चुकवावा, पटकन पोलिस स्टेशनला किंवा आपल्याला कसे कळवावे, तिचे/मुलांचे आवश्यक पेपर्स योग्य ठिकाणी कसे ठेवावेत इ. गोष्टींची तिला माहिती द्यावी. शेजारच्यांकडे पोलिस स्टेशनचा किंवा आपल्या केंद्राचा नंबर ठेऊन जेव्हा तिला हिंसेतून सुटणे शक्य नसेल तेव्हा आपल्याला कळवायला सांगणे.

९. सर्वांगाने विचार करणे - कौटुंबिक हिंसाचार हा अनेक हात-पाय-डोके असलेला अजब विषय आहे. त्यामुळेच हिंसाचारात असलेलया स्त्रीया पटकन हताश होतात कारण त्या एक समस्या सोडवितात तोपर्यंत दुसरी त्यांच्या पुढे आलेलीच असते हे आपण आता अनुभवातून, अभ्यासातून शिकलो आहोत, त्यामुळे त्यावरच्या उपायांचा विचारही असाच सर्वांगानी करायला हवा. कुठल्याही स्त्रीला हया अत्याचारातून बाहेर पडायचे असेल तेव्हा

कौटुंबिक हिंसाचार हया विषया संदर्भात काम करणा-या सर्व यंत्रणांनी एकाच दिशेने (तिला हिंसाचार मुक्त करण्यासाठीच्या दिशेने) एकाच प्रेरणेने आणि ताकदीने काम केले तरच त्याचा फायदा होईल, दिसेल. उदा. आपण बाईंना खूप तयार केले, हिंसाचार थांबवू शकतो याचा विश्वास दिला आणि परत त्रास झाला तर पोलिस स्टेशनला जा म्हणून समजावले आणि प्रत्यक्ष स्त्रीला पोलिस स्टेशनला कोणी मदत केलीच नाहीतर तो मारणारा नव-यालाही धाक बसणार नाही आणि बाईंचा कॉनफिडन्सही वाढायचा नाही. त्यामुळेच संबंधित यंत्रणांमधील समन्वय हा अत्यत महत्वाचा आहे.

१०. अनेक गोष्टींचा विचार एकाच वेळेस करणे- कौटुंबिक हिंसाचारातून बाहेर पडू इच्छिणा-या स्त्रीला मदत करतांना नाविन्यपूर्ण उपाय आणि एकाच वेळेस अनेक मार्गाने विचार करणे आवश्यक असते. जसे दवाखान्यात अचानक अपघात होऊन आलेलं पेशंट असेल, अपघात कसा झाला नेमकं कुठे लागले हे सांगण्याची पेशंटची अवस्था नसते तेव्हा उपचार करणारा डॉक्टर काय झाले असण्याची शक्यता वाटते अशा ब-याच गोष्टी विचार करून त्यानुसार उपचाराचे नियोजन करतो. प्रसंग कितीही अवघड, कठिण असेल तरि तो/ती डॉक्टर खचून जात नाही, ती भूमिका आपल्यालाही करायची असते.

११. प्रशिक्षण - कौटुंबिक हिंसाचार झाल्यानंतर त्या स्त्रीचे ज्या ज्या यंत्रणे संदर्भात संपर्क येईल, त्या त्या यंत्रणेला या विषयासंदर्भात संवेदनशिल बनवणे आवश्यक आहे. आपण आता जे समजावून घेतले ते सर्व या यंत्रणापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, त्यासाठी अंगणवाडी, वैद्यकिय सेवेत- नर्सेस, प्राथमिक आरोग्य केंद्र, डॉक्टर्स इ., पोलिस इ.चे प्रशिक्षण आयोजत करणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणात समस्या निर्माण कशी झाली? का झाली? कोणी केली? त्यावर काय उपाय असू शकतो? हिंसाचाराचे परिणाम कसे समजावून घ्यायचे तसेच हे समजावून घेण्यासाठी त्या स्त्री बरोबर संवाद कसा असावा इ. विषय या प्रशिक्षणात असावे असे वाटते.

१२. जनसंपर्क असलेले शासनाचे जे जे विभाग आहेत किंवा निमशासकिय कार्यालय, प्रकल्प आहेत त्यांना हिंसाचारातून बाहेर पडू इच्छिणा-यांना मदत करण्यासाठी असलेल्या यंत्रणांची माहिती पुरवली पाहिजे. उदाअंगणवाडी सेविका- मदतनीस यांना अशा केंद्रांची माहिती असेल तर त्यांचा मुलांच्या निमित्ताने गावाशी, घरातल्या महिलांशी संपर्क असतो त्यामुळे अशी हिंसाचारग्रस्त महिला असेल तर तिला त्या ही माहिती देऊ शकतील. यासाठी अंगणवाडी, पोलिस पाटील, प्राथमिक आरोग्य केंद्र अशा प्रकल्पांच्या, कार्यालयांच्या बैठकांना आपण नियमित गेले पाहिजे.

# संस्था परिचय

संगिनी महिला जागृती मंडळ, नाशिक ही नोंदणीकृत सामाजिक संस्था गेली १८–१९ वर्ष नाशिक जिल्हा परिसरात निरोगी, आनंदी, सर्व प्रकारच्या समानतेवर आधारित असलेल्या समाज निर्माण व्हावा यासाठी सक्रीय काम करीत आहे. नाशिक शहरातल्या राहुलवाडी नावाच्या नावाच्या एका मोठ्या झोपडपट्टीत जन्मलेल्या सात मुलींनी मिळून सुरु केलेली ही संस्था स्त्रियांवर होणारे अत्याचार थांबावे यासाठी स्वतःला कटीबध्द करते आहे.

हिंसाचार मुक्त समाज निर्माण होऊ शकतो यावर आमचा विश्वास आहे म्हणूनच आम्ही त्यासाठी हा प्रवास सुरु केला आहे. सावित्रीमाई फुले यांचे पासून स्त्री शिक्षणाचा सुरु झालेला लढा पुढे न्यावा असे आम्हांला वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या गुरुंचा हा लढा पुढे नेला आणि त्याला भारताच्या संविधानाचे अधिष्ठान दिले ज्यामुळे स्त्रिया आता अधिक सक्षम झाल्या आहेत. स्त्रियांवर होणारे विविध अत्याचार कसे हाताळायचे यावरचे अनेक मार्ग आता स्त्रिया घेतांना दिसतात. त्याप्रमाणात पुरुष मात्र ह्या समानतेवर आधारित समाजासाठी पुरता तयार झालेला नाही असा आमचा फिल्ड वरचा अनुभव सांगतो आणि म्हणूनच स्त्रियांवरील अत्याचार ह्या विषयावर ‘पुरुषां’ सोबत काम करण्याचे आम्ही निश्चित केले आणि त्या दिशेने आमच्या प्रवासाला सुरुवात केली.

पुरुषांचाजुलमी स्वभाव किंवा स्त्रियांचा अत्याचार सहन करण्याचा स्वभाव हा जन्मताच नसून उपलब्ध समाजातील लिंग विषमतेमुळे तो असा बनला आहे हे आता अनेक अभ्यासाने सिध्द झाले आहे आणि याच अभ्यासांनी हे ही सिध्द केले आहे की विविध प्रकारच्या प्रशिक्षणाने ‘मानवात’ बदल होतो. म्हणूनच ‘संगिनी’ ने पुरुषां सोबत काम करण्याचे ठरविले आहे. मग ती संधी शाळेतील इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांबरोबर घ्यावयाचे ‘मासिक पाळी’ ही सत्र असो की अकरावी–बारावी च्या विद्यार्थ्यांबरोबर घ्यावयाचे ‘जेंडर आणि हिंसाचार’ ह्या विषयावरील सत्र असो हे सर्व ह्या कामाचा भागच असेल. ‘मैत्र कारवाँ’ सारख्या अभिनयातून लिंग समानता असू शकते, तुम्ही कुठल्याही लिंगाचे असाल, तुमची मानसिकता काहीही असेल तरी ती मानसिकता तुम्ही व्यक्त करु शकता आणि सन्मानाने जगू शकता हा विश्वास देण्याचा प्रयत्न सुरु आहेत. असे अनेक कार्यक्रम करु इच्छिणारी ‘संगिनी’ अनेकांचा सहभाग यात मिळिवण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहे. तुमच्या कडे जे काही जास्त असेल– वेळ, पैसा, ज्ञान, कौशल्य, तंत्रज्ञान किंवा श्रम ‘संगिनी’च्या द्वारा समाजाला द्या असे आवाहन यानिमित्त आम्ही करीत आहोत.

****